❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | गुरुवार, दि. १७ सप्टेंबर २०२६ | ❖ पाने : ८ ❖ अंक : २६३ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक




# गणेशोत्सवात भाविकांना त्रास नको

## जरांगेंनी आंदोलनाला स्थगिती द्यावी : मंत्री राधाकृष्ण विखे पाटलांचे आवाहन

### सातारा-कोल्हापूर गॅझेटबाबत कायदेशीर पेच स्पष्ट

■ मुंबई (दै. संध्या)

मराठा आरक्षणासाठी आंतरवाली सराटी येथून मुंबईच्या दिशेने निघालेले आंदोलक मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनावर राज्य सरकारकडून समन्वयाची आणि सामंजस्याची भूमिका पुन्हा एकदा स्पष्ट करण्यात आली आहे."सरकारने मराठा समाजाच्या बहुतांश सर्व मागण्यांवर सकारात्मक कार्यवाही सुरू केली आहे. सध्या संपूर्ण महाराष्ट्रात हिंदू धर्माचा सर्वात मोठा उत्सव म्हणजे गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. मुंबई आणि पुण्यासारख्या शहरांमध्ये लाखो भाविक रस्त्यावर असतात. त्यामुळे भाविकांना कोणताही त्रास होऊ नये आणि उत्सवात व्यत्यय येऊ नये, म्हणून जरांगे यांनी गणेशोत्सव संपेपर्यंत आपले आंदोलन स्थगित करावे," असे कळकळीचे आवाहन मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले आहे. पत्रकार परिषदेत विखे पाटील यांनी आंदोलनातील कायदेशीर अडचणी, गॅझेटची वस्तुस्थिती आणि नेत्यांवर वापरल्या जाणाऱ्या भाषेवर सविस्तर भाष्य केले.

मनोज जरांगे यांच्याकडून सातारा आणि कोल्हापूर गॅझेट लागू करण्याबाबत होत असलेल्या मागणीवर बोलताना विखे पाटील यांनी कायदेशीर वस्तुस्थिती मांडली. सातारा आणि कोल्हापूर गॅझेटच्या अंमलबजावणीमध्ये काही तांत्रिक व कायदेशीर मुद्दे उपस्थित झाले आहेत. त्यामुळे सरकारने हे संपूर्ण प्रकरण राज्याच्या महाधिवक्त्यांकडे कायदेशीर अभिप्रायासाठी पाठवले आहे. "हैदराबाद गॅझेटचे मूळ प्रकरण सध्या उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे. न्यायालयीन प्रक्रिया सुरू असताना जर सरकारने घाईगडबडीत नवीन गॅझेट लागू केले आणि न्यायालयाने त्याला स्थगिती दिली, तर मोठा कायदेशीर पेच निर्माण होईल. त्यामुळे ॲडव्होकेट जनरल यांच्याकडून जसा कायदेशीर सल्ला प्राप्त होईल, त्यानुसारच शासन पुढील ठोस पावले उचलेल," असे त्यांनी स्पष्ट केले. या प्रक्रियेला थोडा वेळ लागणार असल्याने जरांगे यांनी सरकारला पुरेसा वेळ द्यावा, अशी विनंती त्यांनी केली.



मनोज जरांगे यांच्याकडून मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि मंत्र्यांवर केल्या जाणाऱ्या शाब्दिक हल्ल्यांवर विखे पाटील यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. "लोकशाहीत प्रत्येकाला मत मांडण्याचा आणि आंदोलन करण्याचा पूर्ण अधिकार आहे. परंतु, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत सातत्याने वापरली जाणारी भाषा ही महाराष्ट्राच्या संस्कृतीला धरून नाही." "माझ्याबद्दलही काही वक्तव्ये झाली आहेत, मात्र मी समाजाच्या हितापुढे वैयक्तिक प्रतिष्ठेचा प्रश्न करत नाही. परंतु देवेंद्र फडणवीस आणि एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षणासाठी जे धाडसी निर्णय घेतले, तसे काम यापूर्वी कोणत्याही मुख्यमंत्र्यांनी केले नव्हते. जे नेते आरक्षण देण्यासाठी सर्वतोपरी पुढाकार घेत आहेत, त्यांच्याविषयी अशी हीन वक्तव्ये करणे टाळले पाहिजे," असा सल्ला त्यांनी दिला.

### पुण्यात मुख्यमंत्र्यांना घेराव

एकीकडे मनोज जरांगे पाटील हे मुंबईच्या दिशेने निघाले आहेत तर दुसरीकडे राज्यभर मराठा आंदोलनक आक्रमक झाल्याचं दिसून येत आहे. पुण्यात मराठा आंदोलकांनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनाच घेराव घालण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या निवासस्थानी आले असला मुख्यमंत्र्यांना घेराव घालण्याचा प्रयत्न मराठा आंदोलकांनी केला. यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप करत गोंधळ घालणाऱ्या आंदोलकांना ताब्यात घेतल्याने परिस्थिती नियंत्रणात आली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या निवासस्थानी गणेशाचं दर्शन घेण्यासाठी आले होते. यावेळी मराठा आंदोलकांनी या ठिकाणी जात मुख्यमंत्र्यांच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. तसेच मुख्यमंत्र्यांना घेराव घालण्याचा प्रयत्नही यावेळी करण्यात आला. पोलिसांनी हस्तक्षेप करत मराठा आंदोलकांना सुरुवातीला समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र आंदोलकांची घोषणाबाजी सुरूच असल्याने पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतलं. 'शरीरापेक्षा दौरा महत्त्वाचा नाही. दौरा रद्द करावा लागेल. माझ्या जागेवर कोणीही असू द्या, समाजासाठी एक बळी जाऊ द्या', असं मनोज जरांगे म्हणाले. जरांगेंच्या या शब्दांनी आंदोलनाचा संघर्ष किती टोकाला पोहोचला आहे, याची जाणीव होते. त्यातच मुंबई पोलिसांनी गणेशोत्सव आणि कायदा-सुव्यवस्थेचं कारण देत आझाद मैदानावरील आंदोलनाला परवानगी नाकारली आहे.



## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुण्यातील सार्वजनिक गणेश मंडळांना भेटी

■ पुणे (दै. संध्या)

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुण्यातील विविध सार्वजनिक गणेश मंडळांना भेटी देऊन श्री गणरायाचे दर्शन घेतले तसेच आरती केली. यावेळी विविध गणेश मंडळांच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा सत्कार करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मानाचा कसबा गणपती, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती, साने गुरुजी तरुण मंडळ तसेच श्रीसाई मित्रमंडळ ट्रस्ट येथील श्री गणरायाचे दर्शन घेऊन आरती केली. तसेच महापौर मंजुषा नागपुरे आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या निवासस्थानी भेट देऊन श्री गणरायाचे दर्शन घेतले. यावेळी केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, खासदार नितीन नबीन, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील, आमदार रवींद्र चव्हाण, योगेश टिळेकर, हेमंत रासणे, कसबा गणपती मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत शेटे, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराचे अध्यक्ष सुनील रासणे, साने गुरुजी तरुण मंडळाचे अध्यक्ष धीरज घाटे यांच्यासह विविध गणेश मंडळांचे विश्वस्त व पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांनी ढोल वाजविण्याचा घेतला आनंद, श्रीसाई मित्रमंडळ ट्रस्टच्या गणपती परिसरात मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांचे पारंपरिक ढोल-ताशा गजरात पथकाने स्वागत केले. यावेळी त्यांनी ढोल वाजविणाऱ्या युवकाकडून टिपरू काठी घेत स्वतः ढोल वाजविण्याचा आनंद घेतला.

## थोडक्यात...

### 'लालबागचा राजा'चरणी भाविकांची गर्दी

मुंबई : दैनिक संध्या

गणेशोत्सवात मुंबईकरांचं श्रद्धास्थान आणि नवसाला पावणारा गणपती बाप्पा अशी ख्याती असलेल्या लालबागचा राजाच्या दर्शनाला भाविकांची मोठी गर्दी दिसून येत आहे. पहिल्याच दिवसापासून सेलिब्रिटी, दिग्गज नेते आणि सर्वसामान्य भाविकांनीही राजाचे दर्शन घेण्यासाठी धाव घेतली आहे. चरणस्पर्श दर्शनासह मुखदर्शनसाठीही राजाचरणी मोठी गर्दी होत असून भाविकांकडून भरभरुन दानही अर्पण केलं जात आहे. आपल्या नवसाची पूर्तता, आणि नवसाची मागणी करत भाविकांकडून रोख, आणि मौल्यवान वस्तूंच्या रुपाने बाप्पाचरणी दान अर्पण केलं जात आहे. आज दुसऱ्या दिवशी तब्बल 88 लाख 90 हजारांचे दान प्राप्त झाले आहे. लालबागच्या राजा चरणी भाविकांकडून भक्तीभावाने आणि मोठ्या श्रद्धेने दान अर्पण केलं जात असून पहिल्याच दिवशी 48 लाख 50 हजार रुपयांचं दान अर्पण करण्यात आलय. तर, बाप्पाच्या चरणी दुसऱ्या दिवशी देखील भाविकांनी भरभरून दान दिलंय. दुसऱ्या दिवशी 88 लाख 90 हजार रुपयांचं दान भाविकांकडून अर्पण करण्यात आलं आहे. लालबाग राजाच्या स्टेज पेटीमध्ये 59 लाख 70 हजार रुपयांचे दान तर रंग पेटीमध्ये 29 लाख 30 हजार रुपयांचे दान आज अर्पण झालंय. त्यामध्ये, दुसऱ्या दिवशी 226 ग्रॅम सोनं आणि 5516 ग्रॅम चांदीच्या वस्तू दान करण्यात आल्या आहेत. त्यामुळे, पहिल्या दोन दिवसांत राजाच्या चरणी 1 कोटी 37 लाख 40 हजार रुपयांचे दान प्राप्त झालं आहे.

## वेस्ट इंडिजच्या दौऱ्यासाठी टीम इंडियाच्या वनडे आणि टी २० संघाची घोषणा

### रोहित शर्मा आणि विराट कोहली लवकरच मैदानावर दिसणार

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

बीसीसीआयनं वेस्ट इंडिज विरोधातील वनडे आणि टी 20 मालिकेसाठी भारताचे संघ जाहीर केले आहेत. वनडे सामन्यांच्या मालिकेसाठी भारताचं कर्णधारपद शुभमन गिलकडे असेल. तर टी 20 मालिकेसाठी भारताचं नेतृत्व श्रेयस अय्यर याच्याकडे असेल. भारताच्या वनडे संघात रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा समावेश आहे. आशियाई क्रीडा स्पर्धेमुळं काही खेळाडू उपलब्ध नसल्यानं आकिब नबी आणि नमन धीर यांना संधी मिळाली आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या वनडे सामन्यांच्या मालिकेसाठी भारताचा संघ जाहीर करण्यात आला आहे. शुभमन गिलकडे कर्णधारपद, तर केएल राहुलकडे उपकर्णधारपद आणि यष्टिरक्षकाची जबाबदारी देण्यात आली आहे. ध्रुव जुरेलचा देखील यष्टिरक्षक म्हणून संघात समावेश करण्यात आला आहे. या संघात रोहित शर्मा, विराट कोहली, ऋतुराज गायकवाड, यशस्वी जैस्वाल, रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज यांच्यासह युवा खेळाडूंनाही संधी मिळाली आहे. विशेष म्हणजे रोहित शर्मा आणि विराट कोहली यांचा संघात समावेश असल्याने या मालिकेकडे क्रिकेट चाहत्यांचे लक्ष लागले आहे. वनडे मालिका 27 सप्टेंबरपासून सुरु होणार असल्यानं विराट कोहली आणि रोहित शर्माच्या चाहत्यांसाठी ही मालिका पर्वणी ठरणार आहे. दोन्ही खेळाडू पुन्हा एकदा वनडे मालिकेत भारतात खेळताना चाहत्यांना पाहायला मिळणार आहेत.

**वनडे मालिकेचं वेळापत्रक**
पहिला सामना : 27 सप्टेंबर, तिरुअनंतपुरम
दुसरा सामना : 30 सप्टेंबर, गुवाहाटी
तिसरा सामना : 3 ऑक्टोबर, न्यू चंदीगढ

**टी 20 मालिकेचं वेळापत्रक**
पहिली मॅच : 6 ऑक्टोबर, लखनौ
दुसरी मॅच :9 ऑक्टोबर,रांची
तिसरी मॅच :11 ऑक्टोबर, इंदोर
चौथी मॅच : 14 ऑक्टोबर, हैदराबाद
पाचवी मॅच : 17 ऑक्टोबर, बंगळुरु

भारताचा वनडे संघ : शुभमन गिल( कर्णधार),केएल राहुल(उपकर्णधार आणि यष्टिरक्षक) ध्रुव जुरेल (यष्टिरक्षक) रोहित शर्मा, विराट कोहली, ऋतुराज गायकवाड, यशस्वी जैस्वाल, रवींद्र जडेजा, कुलदीप यादव, मोहम्मद सिराज, नितीशकुमार रेड्डी, प्रसिद्ध कृष्णा, गरुनूर ब्रार, अकिब नबी, नमन धीर

वेस्ट इंडिज विरोधातील टी 20 मालिकेसाठी भारताचा संघ : श्रेयस अय्यर (कर्णधार), अभिषेक शर्मा, वैभव सूर्यवंशी, इशान किशन (विकेटकीपर), संजू सॅमसन (विकेटकीपर), तिलक वर्मा (उपकर्णधार), शिवम दुबे, कुलदीप यादव, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, रवि बिश्नोई, नितीशकुमार रेड्डी, अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव, मयांक यादव

## आज मुंबईकडे निघणार : मनोज जरांगे पाटील

### उदय सामंत फॅरेसहन संपर्कात : १३ पैकी १२ मागण्या मान्य



■ पुणे (दै. संध्या)

मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी 19 व्या दिवशीही आपलं उपोषण सुरूच ठेवलं असून शंकरगडाच्या महंतांच्या सांगण्यावरुन त्यांनी सलाईन आणि पाणी घेतलं. त्यानंतर, पाटोद्यात पत्रकार परिषद घेत आंदोलनाच्या पुढील दिशेबाबत माहिती दिली. मी आज इथंच मुक्काम करणार असून उद्या दुपारी 1 वाजता मुंबईकडे निघणार आहे. मी मुंबईला जाणारच, अशी ठाम भूमिका जरांगे पाटलांची आहे. मात्र, माझ्यासोबत कोणीही येऊ नये, मी सांगेल तेव्हाच सगळ्यांनी यायचं, असे आवाहनही जरांगे पाटलांनी मराठा बांधवांना केलं.

आता, जरांगे पाटलांच्या भूमिकेनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी प्रतिक्रिया दिली आहे. उत्सवात कुठेही ताण येईल, अशी भूमिका त्यांनी घेऊ नये, असे फडणवीसांनी म्हटले. मनोज जरांगे पाटील यांच्या भूमिकेवर भाष्य करताना, सरकारने त्यांच्या 13 पैकी 12 मागण्या मान्य केल्या आहेत, एक मागणी आहे तिला कायदेशीर अडचण असून त्यांना याबाबत सांगितले आहे. राज्य सरकारने नेहमीच चर्चा केली आहे, चर्चेची दारं उघडी ठेवली आहेत, अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. मनोज जरांगे यांनी त्यांच्या तब्येतीची काळजी घ्यावी, उपोषण नंतरही करता येईल, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी केलंय.

मुंबई, पुण्यात गणेशोत्सव सुरू आहे, मोठा उत्साह असतो, लोकांची संख्या अधिक असते, अशात आंदोलनाचा निर्णय जरांगे यांनी घेऊ नये, उत्सवात कुठेही ताण येईल अशी भूमिका त्यांनी घेऊ नये. अनेक दिवसांपासून त्यांच आंदोलन सुरू आहे, त्यांच्या तब्येतीवर परिणाम होत आहे, आता त्यांनी एडमिट झालं पाहिजे, उपचार घेतले पाहिजे असे आमचे मत असल्याचेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी म्हटले. सरकार खुल्या मनाने सगळ्या गोष्टी मान्यच करत आहे, मग मुंबई, पुण्याला येऊन या ठिकाणी गणेश उत्सवाला ताण येईल असा निर्णय त्यांनी घेऊ नये.

### बैठकीत चर्चा - मुख्यमंत्री

आशीर्वाद द्या हीच प्रार्थना माझी श्रीगणेश चरणी आहे. सध्या दुष्काळसदृश्य परिस्थिती आहे, सुरुवातीला चांगला पाऊस पडल्यानंतर मोठा खंड पडला आहे. शेतकऱ्यासमोर खूप मोठा प्रश्न निर्माण झालाय. कालच्या मंत्रिमंडळ बैठकीत यावर सविस्तर चर्चा झाली आहे. एनडीआरएफ नियमानुसार 5 ऑक्टोंबरपर्यंत सर्व्हे करता येत नाही, पण तोपर्यंत प्राथमिक सर्व्हे आम्ही करतोय. कुठलाही भाग असो, त्या शेतकऱ्यांना पूर्ण मदत आम्ही करणार आहोत, अशी माहिती देखील मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिली. श्री गणेशाच्या आशीर्वादाने राज्य सरकार पूर्ण शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे, असेही ते म्हणाले.

## ना दिशा सालियनला भेटलो, ना तिच्याशी ओळख

### अफवांचा धुरळा उडवणं बंद करा, आदित्य ठाकरेंची ६ वर्षांनी पहिली प्रतिक्रिया

■ मुंबई (दै. संध्या)

आदित्य ठाकरे यांनी एक्सवर पोस्ट करत दिशा सालियन यांना कधीही भेटलेलो नाही, असं म्हटलं आहे. राजकीय हेतूने, वैयक्तिक द्वेषापायी, चारित्र्यहनन करण्याच्या हेतूने काही लोकांकडून गेल्या ६ वर्षांपासून वारंवार ह्या दुर्दैवी घटनेशी कुठलाही पुरावा वा संबंध नसतानाही माझं नाव जोडण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न सुरु आहे, असंही आदित्य ठाकरे यांनी म्हटलं आहे. दिशा सालियन मृत्यू प्रकरणाची सीबीआयकडून चौकशी करण्यात येणार असल्याच्या पार्श्वभूमीवर सुरु असलेल्या चर्चांनंतर आदित्य ठाकरेंनी प्रतिक्रिया दिली आहे. अफवांचा धुरळा उडवणं बंद करण्यासाठी पुन्हा एकदा फक्त आणि फक्त तथ्य सांगतो! मी दिशा सालियन ह्यांना कधीही भेटलेलो नाही किंवा त्यांच्याशी माझी ओळखही नव्हती. राजकीय हेतूने, वैयक्तिक द्वेषापायी, चारित्र्यहनन करण्याच्या हेतूने काही लोकांकडून गेल्या ६ वर्षांपासून वारंवार ह्या दुर्दैवी घटनेशी कुठलाही पुरावा वा संबंध नसतानाही माझं नाव जोडण्याचा हेतुपुरस्सर प्रयत्न सुरु आहे. कुठलंही तथ्य आणि सत्य नसलेलं हे सततचं खोटं कँपेन दुर्दैवी आहे. बोंबाबोंब करुन केल्या जाणाऱ्या टिव्ही चॅनल्सवरच्या खोट्या चर्चा आणि मिडिया ट्रायल्स सत्य बदलू शकत नाहीत.



अधिकृत यंत्रणांना कुठल्याही व्यत्ययाशिवाय, राजकीय हस्तक्षेपाशिवाय, चारित्र्यहननाशिवाय आणि निःपक्षपातीपणे पुन्हा एकदा नव्याने ही चौकशी करु द्या. परत एकदा सांगतो, ज्यांना वाटत असेल की अश्या चारित्र्यहननाच्या आणि खोट्या प्रचाराच्या मार्गाने तुम्ही आम्हाला शांत बसवू शकाल तर तो तुमचा भ्रम आहे. सत्यासाठी, अन्यायाविरुद्ध, देशवासीयांना सोबत घेऊन आमचा लढा सुरुच राहील!

दिशा सालियन प्रकरण नेमकं काय? दिशा सालियन ही अभिनेता सुशांत सिंग राजपूत याची मॅनेजर होती. तिने 8 जून 2019 ला 12 व्या मजल्यावरुन उडी मारुन आत्महत्या केल्याचं समोर आलं होतं. त्यानंतर 14 जून 2019 ला अभिनेता सुशांत सिंह राजपूत यानं देखील आत्महत्या केली होती.

मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानं दिशा सालियन मृत्यू प्रकरणी दिशाच्या तक्रारीवरुन एफआयआर दाखल झाली आहे.आरोपी म्हणून एफआयआरमध्ये कोणाचं नाव नाही. एफआयआरमध्ये उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, दिनो मोरिया, रोहन रॉय, सूरज पांचोली, रिया चक्रवर्ती, शौविक चक्रवर्ती, सचिन वाझे, परमबीर सिंह यांच्यासह इतरांचा उल्लेख आहे.



# संपादकीय

## अमेरीकेतही लाडक्या बहीण भावाला खिरापत मिळणार?

अमेरीकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी पुढील महिण्यात होणा-या प्रतिनिधीगृहाच्या आणि सिनेटच्या दोन्ही मिळून साधारण ४७० जागाच्या निवडणूकीत सत्ताधारी रिपब्लिकन पक्षाला निर्विवाद बहुमत प्राप्त करून दिले तर प्रत्येक अमेरीकन नागरीकाला प्रत्येकी ५हजार डॉलर देण्याची घोषणा करून या निवडणूकीत रंगत आणलेली आहे. ही सर्व खिरापतीसारखी वाटण्यात येणारी घसघसशीत रक्कम अमेरीका सरकारच्या व्हाईट हाऊसमधील सरकारी तिजोरीतून वाटली जाणार असल्याचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी जाहीर केलेले असून या वाटल्या जाणा-या सरकारी खिरापतीला डिव्हिडंड असे गोंडस नाव दिलेले आहे. या योजनेच्या बळावर ट्रम्प अमेरिकेतील मध्यावधी निवडणूक जिंकून अमेरीकेतील सत्तेवरील आपली पकड अत्यंत मुत्सदीपणे व कुटील राजकारणाने मजबूत करू इच्छित असल्याचे जाणवू लागलेले आहे. या ट्रम्प यांच्या सवंग सनसनाटी घोषणेवरुन अमेरीकेत सर्वत्र टीकेची झोड उठलेली आहे. ट्रम्प हे त्यांच्या देहबोलीतून व वक्तव्यातून विरोधी पक्षाना दाद देतील असे आज तरी वाटत नाही. अमेरीकेतील बलाढ्य विरोधी डेमोक्रटिक पक्षाने या घोषणेला मत खरेदी करण्याची घृणास्पद आणि निंदनीय वाटचाल व भ्रष्टाचाराला राजमान्यता देण्यासाठी चाललेली केविलवाणी धडपड असे संबोधले आहे.सत्ताधारी पक्षाने ही देण्यात येणारी रक्कम श्रीमंत कुटुंबातील मंडळीना दिली जाणार नाही असे स्पष्ट केलेले आहे. सध्या अमेरिकेत कर लावल्यामुळे अमेरिका या प्रगतशील देशाचे उत्पन्नात घसघशीत मोठी वाढ झालेली आहे. त्यामधूनच जनतेला हा लाभाश देण्यात येणार आहे. सध्या अमेरीकेवर ४०लाख डॉलरचे राष्ट्रीय कर्ज असल्याचे सांगण्यात येते. त्यावरील दर वर्षीचे व्याज सव्वा लाख कोटी डॉलर असल्याचे सांगण्यात येते. घोषणेप्रमाणे प्रत्येक नागरीकाला ५ हजार डॉलर दिले तर अर्थसंकल्पात मोठी तूट वाढण्याची भिती अर्थशास्त्रज्ञानी व्यक्त केलेली आहे. ही बक्षीस रक्कम नागरीकाना वितरीत करण्याचे सुरुवात केल्यावर अमेरीकेत महागाई वाढण्याची शक्यता असल्याचे सांगण्यात येते. सरकारी पैशातून मतदाराची मते खरेदी करण्याचा अमेरीकेतील विरोधी पक्षानी तीव्र निषेध व्यक्त केलेला आहे.आपल्या भारत देशातील बिहार. मध्यप्रदेश. महाराष्ट्र या राज्यासह अनेक राज्यात लाडकी बहीण. लाडका भाऊ अशा आकर्षक योजनाच्या घोषणा करून व वाटप करून विधानसभा निवडणूकीत घवघवीत यश संपादन करून राज्यात सत्ता मिळवलेली आहे. हीच भारतातील पध्दत प्रगत अमेरीका देशात निवडणूका जिंकण्यासाठी राबवण्याचा संकल्प केलेला दिसत आहे. आरोग्य. सिंचनप्रकल्प. शिक्षण.शुध्द पाणी. उद्योग. बेरोजगारी या आवश्यक प्रश्नावर लक्ष केंद्रीत करून त्यासाठी लागणारा पैसा वापरला पाहिजे. अशा सवंग घोषणा करून सरकारच्या तिजोरीतील पैशाची लूटमार झालेली आहे. व होत राहाणार आहे. अमेरीकेत राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांची लोकप्रियता घटलेली आहे. व दिवसेदिवस घटत असल्याचे सांगण्यात येते. त्यामुळे आगामी निवडणूका जिंकण्यासाठी ही घोषणा त्यांनी केली असण्याची शक्यता आहे अशी सगळीकडे कुजबुज आहे. सातत्याने वाढत असलेली महागाई. आणि मंदीमुळे अमेरीकेत असंतोष आहे. गेली काही महिणे इराण सोबतच्या युध्दामुळे इंधन महाग झाले आहे. त्यामुळे अमेरिकेत कोणत्याही राजकीय पक्षाला प्रचार करणे अवघड झालेले आहे. त्यामुळे मतदाराशी संपर्क साधणे जिकीरीचे झालेले आहे. त्यामुळे अमेरीकेतील मतदानाचा आपल्याकडे खेचण्यासाठी ट्रम्प यांनी हा अनुदान वाटण्याचा संकल्प केलेला आहे. आता या घोषणेला प्रगतीशील अमेरिकेतील सुजाण नागरीक साथ देतात का या योजनेला धुडकावून लावतात हे येणा-या ३नोव्हेबर च्या प्रतिनिधीगृहाच्या व सिनेटच्या निवडणूकीत सगळ्या जगासमोर येणार आहे.


## 'दगडूशेठ'च्या प्रेम मंदिरावर आकाशात प्रकाशले गणराय

■ पुणे (दै. संध्या)

काळोखलेल्या आकाशात एकापाठोपाठ एक उजळणारे शेकडो दिवे... त्या प्रकाशातून साकारत जाणारी श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीची भव्य प्रतिकृती आणि सार्वजनिक गणेशोत्सवाचे प्रणेते लोकमान्य टिळक यांची प्रतिमा... अशा नेत्रदीपक वातावरणाने 'दगडूशेठ' च्या प्रेम मंदिरावर आकाश प्रकाशले.

श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने ट्रस्टच्या १३४ व्या वर्षीच्या गणेशोत्सवात ३०० ड्रोनच्या माध्यमातून भव्य प्रकाशोत्सव साकारण्यात आला. जय गणेश, सुवर्णयुग तरुण मंडळ, गणपती बाप्पा मोरया... अशी अक्षरे देखील ड्रोनच्या माध्यमातून साकारण्यात आली होती. जुगनू ड्रोन शो यांच्या वतीने हा शो साकारण्यात आला.

सुमारे १२ मिनिटांच्या या प्रकाशोत्सवात ड्रोनच्या माध्यमातून आकाशात श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती आणि लोकमान्य टिळक यांच्या प्रतिकृती साकारण्यात आल्या. तसेच छत्रपती शिवाजी महाराज, महाराष्ट्राची प्रतिकृती आणि भगवा ध्वजही आकाशात साकार झाला. हजारो भाविकांनी हा नेत्रदीपक सोहळा अनुभवला.



## लोकअदालतीत २९८ प्रकरणे निकाली



■ पुरंदर (दै. संध्या)

सासवड येथील दिवाणी व फौजदारी न्यायालयात शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय लोकअदालतीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या लोकअदालतीमध्ये प्रलंबित व दाखलपूर्व अशी एकूण ४०६२ प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी २९८ प्रकरणांमध्ये तडजोड होऊन तब्बल ४ कोटी १ लाख ७१ हजार ९९८ रुपयांची वसुली करण्यात आली.

लोकअदालतीमध्ये ९२८ प्रलंबित प्रकरणे ठेवण्यात आली होती. त्यापैकी १०८ प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यात आली असून, त्यातून ३ कोटी ११ लाख ३६ हजार २३१ रुपयांची वसुली झाली.तसेच ३१३४ दाखलपूर्व प्रकरणे लोकअदालतीसमोर ठेवण्यात आली होती. त्यापैकी १९० प्रकरणांमध्ये तडजोड झाली असून, ९० लाख ३५ हजार ७६७ रुपयांची वसुली करण्यात आली. अशा प्रकारे प्रलंबित आणि दाखलपूर्व अशा एकूण ४०६२ प्रकरणांपैकी २९८ प्रकरणे निकाली काढण्यात आली. या माध्यमातून पक्षकारांना परस्पर संमतीने प्रकरणे मिटविण्याची संधी मिळाली. या राष्ट्रीय लोकअदालतीचे कामकाज पॅनल जज श्री. आर. के. गोपलानी, प्रमुख दिवाणी न्यायाधीश तसेच पॅनल सदस्य अ‍ॅड.सागर सावंत यांनी पाहिले.

यावेळी सासवड वकील संघटनेच्या अध्यक्षा अ‍ॅड. श्रीमती भारती शिंदे,सचिव अ‍ॅड. ललिता झेंडे तसेच इतर पदाधिकारी व वकील सदस्य उपस्थित होते.

तसेच दिवाणी न्यायालयातील न्यायालयीन कर्मचारी, पोलीस कर्मचारी, महावितरण, स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ बडोदा, बँक ऑफ महाराष्ट्र, पंचायत समितीचे अधिकारी आणि ग्रामविकास अधिकारी यांनी लोकअदालतीच्या कामकाजात सहभाग घेतला.

## दौंड तालुक्याचा 'मेडिकल माफिया' कोण?

■ दौंड (दै. संध्या)

तालुक्यातील खुटबाव येथील संशयित कॅल्शियम प्रकरणाच्या वृत्तमालिकेनंतर आता दौंड तालुक्यातील औषधविक्रीच्या संपूर्ण व्यवस्थेवरच प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. एका बाजूला संशयित कॅल्शियमच्या उत्पादनाचा आणि पुरवठा साखळीचा तपास करण्याची मागणी होत असताना दुसऱ्या बाजूला तालुक्यातील काही मेडिकलमध्ये औषधांवर मोठ्या प्रमाणात सवलत दिली जात असल्याची चर्चा आहे.

विशेषतः 'गजानन मेडिकल'च्या विविध शाखांच्या बाहेर ५० टक्के सवलतीत औषधे मिळतात, अशा प्रकारची जाहिरात असल्याचे सांगितले जाते. त्यामुळे औषधांमध्ये एवढी मोठी सवलत देणे नेमके कशा आर्थिक गणितातून शक्य होते, हा प्रश्न आता उपस्थित होत आहे. ५० टक्के सवलतीमागचे गणित काय? एखाद्या औषधाची कमाल किरकोळ किंमत (MRP), खरेदी किंमत, वितरकाचा मार्जिन, किरकोळ विक्रेत्याचा मार्जिन आणि ग्राहकाला दिलेली सवलत यांचा संपूर्ण हिशोब तपासणे आवश्यक आहे.

५० टक्के सवलत देऊनही नफा मिळत असेल तर मूळ खरेदी किंमत किती? औषध कंपनीकडून मिळणारे मार्जिन किती? अशा सवलतीसाठी कोणत्या योजना किंवा क्रेडिट नोट्स मिळतात? आणि सर्व औषधांवर हीच पद्धत लागू आहे का? या प्रश्नांची उत्तरे मिळणे आवश्यक आहे. औषध विभागाची अधिकृत भूमिका पाहता, औषधांच्या विक्री आस्थापनांचे परवाने, औषधांची गुणवत्ता आणि निकृष्ट/बनावट/परवान्याविना विक्रीविरुद्ध कारवाई ही FDAच्या औषध विभागाच्या कार्यक्षेत्रातील बाबी आहेत.

इतर मेडिकल व्यावसायिक गप्प का? दौंड तालुक्यातील इतर मेडिकल व्यावसायिक या सवलतीच्या विक्रीविरोधात उघडपणे बोलण्यास टाळाटाळ करत असल्याची चर्चा आहे. यामागे व्यावसायिक स्पर्धा, बाजारातील दबाव किंवा इतर कोणते कारण आहे, याचीही स्वतंत्र चौकशी होण्याची गरज आहे. कारण औषधविक्री क्षेत्रात पारदर्शकता महत्त्वाची आहे. ग्राहकाला मिळणाऱ्या सवलतीचा आधार, बिलिंग आणि औषधांची खरेदी-विक्री यांचा लेखाजोखा तपासल्यास या चर्चेला कितपत तथ्य आहे, हे स्पष्ट होऊ शकते. महाराष्ट्रभर FDAची कारवाई; मग दौंडमध्ये तपासणी कधी? सध्या महाराष्ट्र FDAकडून औषध उत्पादन आणि विक्री आस्थापनांवर मोठ्या प्रमाणावर तपासण्या सुरू असल्याचे अधिकृत माहितीत दिसून येत आहे. जून ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत राज्यात २,९०२ औषध उत्पादन व विक्री आस्थापनांची तपासणी करून ८८० आस्थापनांवर कारवाई करण्यात आली होती.

## ग्रामोन्नती मंडळाच्या कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात मोफत कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न



■ नारायणगाव(दै. संध्या)

ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव येथे विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधींसाठी आवश्यक आधुनिक कौशल्ये आत्मसात करता यावीत, या उद्देशाने '21st Century Skills Training Program Under Placement Drive' या मोफत कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

ग्रामोन्नती मंडळाचे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नारायणगाव आणि रिलायन्स फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने व मॅजिक बस इंडिया फाउंडेशन यांच्या तांत्रिक सहकार्याने हा उपक्रम राबविण्यात आला. दि. ७ ते १२ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दररोज सकाळी १०.३० ते दुपारी ३.०० या वेळेत महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.

या प्रशिक्षणामध्ये विद्यार्थ्यांना संभाषण कौशल्य, समस्या निराकरण, टीमवर्क व नेतृत्वगुण, वेळेचे व्यवस्थापन, नोकरी शोधण्याच्या रणनीती, मुलाखत कौशल्य, मॉक इंटरव्ह्यू तसेच बायोडाटा व रेझ्युमे लेखन याबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन दिले गेले. तसेच विद्यार्थ्यांना विविध कंपन्यांमधील प्लेसमेंटसाठी आवश्यक तयारी करून घेण्यासाठी विशेष सत्रांचे आयोजन करण्यात आले.

प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रासह प्लेसमेंट सपोर्ट उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच त्यांच्या रोजगार क्षमतेत वाढ होऊन विविध कंपन्यांमध्ये रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे अशी माहिती महाविद्यालयाचे प्राचार्य आनंद कुलकर्णी यांनी दिली.

या उपक्रमासाठी महाविद्यालयाच्या प्लेसमेंट सेलचे प्रमुख प्रा. दिनेश गाजूलवार, प्रा.अंकुश पिंगळे, प्रा.आकाश कांबळे,प्रा. प्रियंका बनकर तसेच सर्व विभागप्रमुखांनी नियोजन केले आहे.

ग्रामोन्नती मंडळाचे कार्याध्यक्ष कृषिरत्न अनिल मेहेर यांनी या उपक्रमाचे कौतुक केले असून,विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख कौशल्ये देणारा हा उपक्रम निश्चितच उपयुक्त ठरेल,असा विश्वास व्यक्त केला. महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे विद्यार्थी व पालकांकडून स्वागत होत आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी सपत्नीक पुणे फेस्टिव्हलच्या श्रींची आरती केली

पुणे : दैनिक संध्या

महाराष्ट्राचे उच्च व तंत्र शिक्षणमंत्री आणि पुणे फेस्टिव्हल अ‍ॅडवाइजरी कमिटीचे चेअरमन चंद्रकांतदादा पाटील व सौ. अंजली चंद्रकांतदादा पाटील यांनी आज पुणे फेस्टिव्हलच्या श्रींचे दर्शन घेऊन श्रद्धापूर्वक आरती केली. याप्रसंगी पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, जनरल सेक्रेटरी व सांस्कृतिक कार्यक्रम मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई व प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

### डॉक्टरांनी बर्किट्स लिम्फोमाशी झुंज देणाऱ्या इरिट्रियातील १४ वर्षीय मुलाचा जीव वाचवला

मुंबई : दैनिक संध्या

संपूर्ण वैद्यकीय पथकाच्या एकत्रित प्रयत्नांमुळे एका १४ वर्षीय मुलाचा जीव वाचवण्यात यश आले. बर्किट लिम्फोमा, सेकंडरी एचएलएच, हृदयविकाराचा झटका आणि मल्टी-ड्रग-रेझिस्टंट सेप्सिस यांसारख्या जीवघेण्या आजारांशी झुंज दिल्यानंतर, एरिट्रियाच्या या मुलाला मुंबईतील नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलमध्ये नवजीवन मिळाले. तो आता पूर्णपणे बरा होऊन घरी परतला आहे. नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटल,मुंबई रुग्णालयातील बालरोग कर्करोग सल्लागार डॉ. कृती हेगडे यांनी सांगितले की, हा मुलगा दोन महिन्यांपासून ताप आणि पोटात गाठ घेऊन भारतात आला होता. मुंबईतील एका रुग्णालयात इलियोसेकम बायोप्सी करण्यात आली, ज्यात बर्किट लिम्फोमाचे निदान झाले. तथापि, त्याची प्रकृती खालावल्याने, त्याला ७ मे २०२६ रोजी नारायणा हेल्थ एसआरसीसी येथे पाठवण्यात आले. दाखल करतेवेळी, ते बाळ अर्धवट शुद्धीत होते, शॉकमध्ये होते आणि व्हेंटिलेटर-इनोट्रोपिक सपोर्टवर होते. चाचण्यांमध्ये अस्थिमज्जेमध्ये एचएलएचची (HLH) लक्षणे आढळून आली. टीमने तात्काळ सायटोरिडक्टिव्ह केमोथेरपी (सायक्लोफॉस्फामाइड, व्हिनक्रिस्टीन आणि प्रेडनिसोन) सुरू केली. उपचारांच्या चौथ्या दिवशी, पल्सलेस व्हेंट्रिक्युलर टॅकीकार्डियामुळे त्याला हृदयविकाराचा झटका आला, जो सीपीआर (CPR) देऊन नियंत्रणात आणण्यात आला. त्यानंतर, त्याला मल्टी-ड्रग-रेझिस्टंट क्लेबसिएला सेप्सिस झाला. दुसऱ्या आठवड्यात ट्यूमर आकुंचन पावू लागला आणि त्याला व्हेंटिलेटरवरून काढण्यात आले. या काळात त्याचे १२ किलो वजन कमी झाले होते आणि तो बोलू किंवा बसू शकत नव्हता.

## प्राधिकरण येथे सामुदायिक अथर्वशीर्ष पठण संपन्न

■ निगडी (दै. संध्या)

दिनांक १५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी , ७:३० वाजता 'श्री गणेश उत्सवा ' निमित्त प्राधिकरण विचार मंच, श्री चिंतामणी मंदिर ट्रस्ट, व प्राधिकरण ज्येष्ठ नागरिक संघ निगडी,भजन महासंघ प्राधिकरण यांच्या वतीने ऋषी पंचमीच्या निमित्ताने, सामुदायिक अथर्वशीर्ष पठण निगडी प्राधिकरण येथे संपन्न झाले.

श्री. चिंतामणी गणेश मंदिर , सेक्टर नं -24 प्राधिकरण निगडी येथे संपन्न झाले. सकाळी ७:३० वाजता भक्तीताई भाटे यांनी सर्वांच्या समोर बसून अथर्वशीर्ष पठण सुरुवात केली, त्यांच्याबरोबर उपस्थित सर्वांनी अथर्वशीर्ष पठण केले. यावेळी अथर्वशीर्ष पठणचे २१ आवर्तने घेण्यात आले. अथर्वशीर्ष पठणनंतर फलश्रुती घेण्यात आली व गणपतीची सामुदायिक आरती करुन प्रसाद वाटप करण्यात आले. अथर्वशीर्ष पठण सामुदायिक कार्यक्रमाचे यंदा १४ वे वर्ष असून कार्यक्रमास, निगडी प्राधिकरण व परिसरातील महिला, पुरुष, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, व ज्ञानप्रबोधिनी शाळेतील विद्यार्थी विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते .तसेच परिसरातील अनेक गणेशभक्त उपस्थित होते. कार्यक्रमाला विशेष उपस्थिती, कार्यक्रमाचे आयोजन व नियोजन बाळा दानवले,उपाध्यक्ष मनसे, चंद्रशेखर जोशी अध्यक्ष प्राधिकरण ज्येष्ठ नागरिक संघ, कार्यक्रमाचे, सूत्रसंचालन ज्योती कानेटकर सचिव भजन महासंघ यांनी केले, या कार्यक्रमात महेश ढाकणे सचिव श्री चिंतामणी मंदिर ट्रस्ट, सुभाष जोशी मा. अध्यक्ष, जगन्नाथ वैद्य मा,अध्यक्ष समाधान सुसर ज्ञान प्रबोधिनीचे उपमुख्याध्यापक बाळासाहेब साळुंखे उपस्थित होते.



RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे

### Kothare is back on duty!”"मिरांडा वॉर्निंग" येतोय २७ नोव्हेंबरला

पुणे : दैनिक संध्या




अभिनेता आदिनाथ कोठारेनं आजवर वेगवेगळ्या भूमिकांतून स्वतःच्या उत्तम अभिनयाचा ठसा मराठी-हिंदी कलाकृतींतून उमटवला आहे. आता आदिनाथ "मिरांडा वॉर्निंग" या चित्रपटातून पोलिस अधिकाऱ्याच्या भूमिकेत दिसणार असून नुकतेच या चित्रपटाचे पोस्टर सोशल मीडियावर लॉंच करण्यात आले आहे. येत्या २७ नोव्हेंबरला हा चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे. सतनाम फिल्म्स स्टुडिओ आणि ओपन गेट मुव्हीज मार्फत "मिरांडा वॉर्निंग" या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. सचिन धोत्रे यांनी चित्रपटाची निर्मिती आणि दिग्दर्शन केले आहे तर अल्ट्रा मीडिया एंटरटेनमेंटच्या सुशीलकुमार अग्रवाल आणि सुकल्प चित्रच्या कल्पक जोशी यांनी या चित्रपटाची प्रस्तुती केली आहे. सचिन धोत्रे यांनी २०२३ मध्ये 'गेट-टुगेदर' या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं होतं. त्यानंतर 'मिरांडा वॉर्निंग' या चित्रपटातून त्यांनी वेगळा प्रयोग केला आहे. रवींद्र मठाधिकारी, सायली मठाधिकारी यांनी चित्रपटाचं लेखन केलं आहे. फार्महाऊसवर एक खूनाची घटना घडते आणि त्यानंतर सुरु होतो एक थरारक शोध. या शोधात काय काय घडतं याची रंजक गोष्ट "मिरांडा वॉर्निंग" या चित्रपटात पहायला मिळणार आहे. या चित्रपटात आदिनाथ कोठारेसह उत्तम स्टारकास्ट पहायला मिळणार आहे. मराठी चित्रपटसृष्टीत सस्पेन्स, थ्रिलर प्रकारातील चित्रपटांना वेगळ्या उंचीवर नेण्याचा प्रयत्न "मिरांडा वॉर्निंग" या चित्रपटातून करण्यात आला आहे. उत्कृष्ट कथानक, कसलेले कलाकार, तांत्रिकदृष्ट्या सक्षम कलाकृती ही "मिरांडा वॉर्निंग" चित्रपटाची वैशिष्ट्य आहेत. आदिनाथ कोठारेचा उत्तम अभिनय आणि त्यात खूनाचा शोध घेणारा रफटफ पोलिस अधिकारी हेही महत्त्वाचं वेगळेपण आहे. त्यामुळे "मिरांडा वॉर्निंग" या नावापासून चित्रपटाविषयी उत्सुकता वाढली आहे.



### व्होल्वो सीईने बाउमा कॉनएक्सपो इंडिया 2026 मध्ये ईसी650 मायनिंग एक्स्कॅव्हेटर लॉन्च केला

पुणे : दैनिक संध्या

व्होल्वो कन्स्ट्रक्शन इक्विपमेंट इंडियाने बाउमा कॉनएक्सपो इंडिया 2026 मध्ये आपल्या मायनिंग लाइन-अपमध्ये महत्त्वाची भर ठरणाऱ्या 65-टन क्लासच्या एक्स्कॅव्हेटर ईसी650चे कमर्शियल लॉन्च केले. लोकप्रिय व्होल्वो D13E इंजिनद्वारे 435 एचपीची पॉवर देणारा ईसी650 अधिक टिकाऊपणा आणि बेस्ट-इन-क्लास फ्युएल एफिशिएन्सीसाठी इंजिनीअर्ड करण्यात आला आहे. यात मजबूत अंडरकॅरेज, हेवी-ड्यूटी बूम आणि आर्म तसेच ॲडव्हान्स्ड हायड्रॉलिक्स देण्यात आले आहेत, जे अत्यंत कठीण मास एक्स्कॅव्हेशन आणि मायनिंग ॲप्लिकेशन्समध्येही दमदार कामगिरी करण्यासाठी तयार करण्यात आले आहेत. खरेदीचा सीझन सुरू होत असताना, मायनिंग ग्राहकांसाठी या उत्पादनाची त्वरित डिलिव्हरी उपलब्ध आहे. व्होल्वोच्या Equipment-as-a-Service ऑफरिंगद्वारेही हे उत्पादन उपलब्ध होणार आहे. यामुळे ॲडव्हान्स्ड मायनिंग आणि कन्स्ट्रक्शन सोल्यूशन्सचा स्वीकार वेगाने वाढवण्यासाठी कंपनीचा कस्टमर-सेंट्रिक दृष्टिकोन अधिक मजबूत होतो. मशीनपुरतेच मर्यादित न राहता, व्होल्वो संपूर्ण इक्विपमेंट लाइफसायकलदरम्यान ग्राहकांना सपोर्ट देणार आहे. यामध्ये कनेक्टेड सर्व्हिसेस, प्रोडक्टिव्हिटी सोल्यूशन्स, रिपेअर आणि मेंटेनन्स ॲग्रीमेंट्स तसेच ॲप्लिकेशन-लेड ऑफरिंग्सचा समावेश आहे. या माध्यमातून अपटाइम, एफिशिएन्सी आणि साइटची एकूण कामगिरी सुधारण्यास मदत होईल. तसेच, भारताच्या पायाभूत सुविधांच्या विकासाला आणि ‘विकसित भारत’च्या व्हिजनला हातभार लागेल. कन्स्ट्रक्शन आणि इंडस्ट्रियल झोनमधील व्होल्वो सीईच्या स्टँडचे मुख्य आकर्षण म्हणजे त्यांची 20-टन क्लासमधील विस्तृत एक्स्कॅव्हेटर रेंज—ईसी210, ईसी215 आणि ईसी220. रोड कन्स्ट्रक्शन, अर्बन कन्स्ट्रक्शन, क्वॉरिंग, रिव्हर-बेड मायनिंग यांसारख्या विविध ॲप्लिकेशन्ससाठी ही रेंज उत्तम वर्सेटिलिटी देते. यासोबत ईसी300, एसडी110, डीडी90 आणि एल120 इलेक्ट्रिक व्हील लोडर देखील प्रदर्शित करण्यात आले आहेत. तर मायनिंग झोनमध्ये ईसी480, ईसी650 आणि एल150 हे प्रमुख आकर्षण ठरले आहेत. या झोनमध्ये प्रोडक्टपेक्षा विविध ॲप्लिकेशन्सच्या गरजांवर आधारित सोल्यूशन्सवर अधिक भर देण्यात आला आहे. हा शोकेस व्होल्वो सीईच्या नव्या ‘आज बनाएं कल’ (“आजच उद्याची उभारणी करूया”) या कॅम्पेनशी जोडलेला आहे. या कॅम्पेनच्या माध्यमातून देशातील मुलांची स्वप्ने आणि दररोज राष्ट्रनिर्माणात योगदान देणारे कॉन्ट्रॅक्टर्स, ग्राहक आणि ऑपरेटर्स यांच्या माध्यमातून भारताच्या पायाभूत सुविधांच्या विकासाची कहाणी मांडली जाते. भारताचे भविष्य घडवण्यासाठी देशातील प्रत्येक बिल्डरने एकत्र येऊन आजच उद्याची उभारणी करावी, असे आवाहन व्होल्वो सीईने या कॅम्पेनद्वारे पुन्हा एकदा केले आहे.

### अत्याधुनिक केंद्रांच्या माध्यमातून पुण्यात जागतिक दर्जाच्या आरोग्यसेवेला नवी दिशा

पुणे : दैनिक संध्या

डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्र, पिंपरी, पुणे येथे तीन अत्याधुनिक केंद्रांचे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये ‘यशराज प्रसाद पाटील’ मल्टी-ऑर्गन ट्रान्सप्लांट सेंटर ऑफ एक्सलन्स, ‘भाग्यश्री’ आई व गोकुळ मदर अँड चाइल्ड सेंटर आणि आयव्हीएफ अँड एन्डोस्कोपी सेंटर यांचा समावेश आहे. महाराष्ट्र शासनाच्या उपमुख्यमंत्री आणि पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. सौ. सुनेत्राताई अजित पवार तसेच महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री मा. श्री. प्रकाश आबिटकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि हस्ते या केंद्रांचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी मा. डॉ. पी. डी. पाटील, कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे; मा. डॉ. (सौ.) भाग्यश्री पी. पाटील, प्र-कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे; मा. डॉ. यशराज पी. पाटील, विश्वस्त व खजिनदार, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटी, पिंपरी, पुणे; मा. डॉ. सोमनाथ पी. पाटील, प्र-कुलपती, ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी, पुणे आणि सचिव, डॉ. डी. वाय. पाटील युनिटेक सोसायटी, पुणे; मा. डॉ. (सौ.) स्मिता जाधव, प्र-कुलगुरू, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे आणि सचिव, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटी, पुणे;मा. प्रा. डॉ. एन. जे. पवार, कुलगुरू, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे; डॉ. ए. रेखा, अधिष्ठाता, डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्र, पिंपरी, पुणे; तसेच डॉ. एच. एच. चव्हाण, वैद्यकीय अधीक्षक, डॉ. डी. वाय. पाटील वैद्यकीय महाविद्यालय, रुग्णालय व संशोधन केंद्र, पिंपरी, पुणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

# टीव्हीएस iQube मिलियनआर स्पेशल एडिशनने पुण्यात एकत्रितपणे 100 हून अधिक वाहने वितरीत करून ग्राहकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादाची नोंद केली

■ पुणे (दै. संध्या)

टीव्हीएस वेणूचा एक भाग आणि दुचाकी आणि तीन चाकी वाहनांच्या निर्मितीमध्ये जागतिक स्तरावर आघाडीवर असलेल्या टीव्हीएस मोटरने TVS iQube च्या ग्राहकांच्या वाढत्या संख्येचा आनंद साजरा केला. यासाठी आज पुण्यात एक मेगा डिलिव्हरी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. एका दिवसात TVS iQube MillionR स्पेशल एडिशन इलेक्ट्रिक स्कूटर्स 100 हून अधिक ग्राहकांना वितरीत करण्यात आल्या, 25 ऑगस्ट रोजी लॉन्च केल्यानंतर अल्पावधीतच या नवीन लॉंच झालेल्या एडिशनला मिळालेला हा जोरदार प्रतिसाद आहे. 10 लाखांहून अधिक TVS iQube स्कूटर्स रस्त्यावर धावत असल्याचा महत्त्वाचा टप्पा गाठल्याच्या आनंदात MillionR स्पेशल एडिशन सादर करण्यात आली आहे.

TVS iQube द्वारे इलेक्ट्रिक मोबिलिटीचा स्वीकार करणाऱ्या दहा लाखांहून अधिक ग्राहकांच्या विश्वासातून प्रेरणा घेऊन, MillionR Edition हा एक महत्त्वपूर्ण टप्पा साजरा करत आहे आणि त्याच वेळी भारताची पसंतीची फॅमिली ईव्ही (EV) म्हणून या स्कूटरचे स्थान अधिक मजबूत करते आहे. टीव्हीएस मोटरच्या ईव्ही पोर्टफोलिओमधील प्रमुख इलेक्ट्रिक स्कूटर म्हणून, TVS iQube ने इलेक्ट्रिक दुचाकींच्या श्रेणीत कंपनीचे नेतृत्व बळकट करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे; तसेच, या वर्षी बाजार हिश्शानुसार टीव्हीएस मोटरला पहिल्या क्रमांकाचे स्थान मिळवून देण्यातही तिचे योगदान आहे.

MillionR Edition ही स्कूटर डिझाइन, तंत्रज्ञान आणि दैनंदिन सोयींचा सुरेख संगम साधत, दहा लाख TVS iQube च्या टप्प्यावर एक वैशिष्ट्यपूर्ण नवीन रूप सादर करते. 3.5 kWh व्हेरिएंटवर आधारित असलेल्या या आवृत्तीमध्ये नॉर्दर्न लाइट्स पासून प्रेरित असा नवीन ऑरोरा ग्रीन ड्युअल टोन रंग, प्रीमियम सीट अपहोल्स्ट्री, खास MillionR बॅजिंग आणि वैशिष्ट्यपूर्ण ग्राफिक्स यांचा समावेश आहे. हे सर्व घटक MillionR Edition ला एक वेगळी ओळख देतात आणि त्याच वेळी, टीव्हीएस iQube ला आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग बनवणाऱ्या त्या दहा लाख ग्राहकांच्या विविध प्रवासांचे तसेच




अनुभवांचे सेलिब्रेशन करतात. टीव्हीएस आयक्यूब मिलियनआर स्पेशल एडिशन दैनंदिन वापरासाठी अधिक सोयीची आहे. यात समोरच्या बाजूला एक युटिलिटी स्टोरेज कंपार्टमेंट आहे, ज्यामुळे स्कूटरची एकूण साठवण क्षमता 32 लिटरवरून 35.5 लिटरपर्यंत वाढते. सोबतच यात एक इंटिग्रेटेड यूएसबी टाइप-सी चार्जिंग पोर्ट देखील आहे. स्कूटरमध्ये 3.5 kWh क्षमतेची बॅटरी कायम ठेवण्यात आली आहे, ती 145 किमीची आयडीसी रेंज देते आणि 118 पेक्षा जास्त कनेक्टेड टेक्नॉलॉजी फीचर्सने सुसज्ज आहे. पुण्यातील मेगा डिलिव्हरी इव्हेंटने हा महत्त्वाचा टप्पा प्रत्यक्षात आणला, जिथे ग्राहक आणि त्यांचे कुटुंबीय इलेक्ट्रिक मोबिलिटीकडे झालेल्या त्यांच्या संक्रमणाचा आनंद साजरा करण्यासाठी एकत्र आले. या इव्हेंटमध्ये इंटरॅक्टिव्ह अनुभव, आकर्षक उपक्रम, ग्राहकांना बक्षिसे जिंकण्याची संधी आणि ग्राहक डिलिव्हरीचा एक आनंदी अनुभव यांचा समावेश होता.टीव्हीएस आयक्यूब मिलियनआर स्पेशल एडिशनची किंमत ₹1,40,710 (प्रभावी एक्स-शोरूम, महाराष्ट्र) इतकी आहे. टीव्हीएस iQube ची श्रेणी ₹1,13,087 (प्रभावी एक्स-शोरूम, महाराष्ट्र) पासून सुरू होते, तर BaaS (बॅटरी ॲज अ सर्व्हिस) अंतर्गत किंमती ₹59,999 पासून सुरू होतात.

## ॲम्पिअरकडून आपल्या ‘बिल्ट फॉर भारत' व्हिजनला पुढे नेत पुणे येथे इलेक्ट्रिक स्कूटर्सचा खास पोर्टफोलिओ सादर

■ पुणे (दै. संध्या)

ग्रीव्हज् इलेक्ट्रिक मोबिलिटी लिमिटेडचा (जीईएमएल) ब्रँड ॲम्पिअरने भारतातील रोजच्या गतिशीलतेच्या वैविध्यपूर्ण गरजा पूर्ण करण्यासाठी बिल्ट फॉर भारत या ॲम्पिअर इलेक्ट्रिक स्कूटर्सच्या संपूर्ण श्रेणीची पुण्यामध्ये घोषणा केली आहे. शक्तिशाली नेक्सस इएक्स+ पासून ते सर्वाधिक विक्री होणाऱ्या मॅग्नस जी मॅक्स, मॅग्नस निओ आणि अत्यंत सुलभ रिओ व्हाईबपर्यंत हा पोर्टफोलिओ ग्राहकांना पेट्रोल स्कूटरकडून इलेक्ट्रिक स्कूटरकडे वळताना त्यांच्या वापराच्या गरजा आणि बजेटनुसार सर्वोत्कृष्ट स्कूटर निवडण्याचा पर्याय देतो. या विस्तृत श्रेणीसह, कामगिरी, व्यावहारिक उपयोगिता किंवा मूल्य यांपैकी ग्राहकाची कोणतीही गरज असली, तरी प्रत्येकासाठी एक ॲम्पिअर स्कूटर उपलब्ध आहे.

या पोर्टफोलिओचे आगमन महाराष्ट्रातील सर्वात जल्लोषात साजरा केला जाणारा सण गणेशोत्सवादरम्यान झाले आहे, जो संपूर्ण राज्यात कुटुंबे



आणि समुदायांना एकत्र आणणारा काळ असतो. ॲम्पिअरसाठी, हा सणासुदीचा काळ भारतातील रस्ते, चालक आणि दैनंदिन प्रवासाच्या वास्तविकतेला लक्षात ठेवून डिझाइन केलेल्या इलेक्ट्रिक स्कूटर्ससह आपले बिल्ट फॉर भारत व्हिजन पुण्यामधील ग्राहकांच्या अधिक जवळ आणण्याची संधी प्रदान करतो.

पोर्टफोलिओची व्यापकता दर्शवत, ॲम्पिअर नेक्सस इएक्स+ आपल्या शक्तिशाली ५ किलोवॅट मोटरसह उत्कृष्ट कामगिरी सादर करते, ज्याला भारतातील सर्वात आव्हानात्मक भूप्रदेशांवर आपली क्षमता सिद्ध करणाऱ्या अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय विक्रमांचे पाठबळ आहे. इंटेलिपॅकद्वारे ३०+ इंटेलिजंट फीचर्ससह सज्ज असलेली नवीन मॅग्नस जी मॅक्स परवडणाऱ्या किमतीत तडजोड न करता कुटुंबे आणि व्हॅल्यू सेगमेंटसाठी व्यावहारिक व कनेक्टेड तंत्रज्ञान आणते. मॅग्नस निओ हे उत्तम अर्गोनॉमिक्स आणि आसनाच्या योग्य उंचीसह शहराच्या रस्त्यांवर दैनंदिन प्रवासाच्या आरामासाठी डिझाइन केले आहे. तर, नुकतीच लॉंच झालेली ॲम्पिअर रिओ व्हाईब ही विद्यार्थी आणि कॉलेज तरुणांना लक्षित करून तयार करण्यात आली आहे, ज्याला नेक्स्ट-जेन एलएफपी बॅटरीचे पाठबळ आहे.

## ब्रिक्सच्या पाहुण्यांना शाकाहारी मेजवानी; डॉ. गंगवाल म्हणतात, ‘हीच भारताची संस्कृती !’

■ पुणे (दै. संध्या)

दिल्ली येथे झालेल्या ब्रिक्स परिषदेदरम्यान विदेशी पाहुण्यांना भारतीय शाकाहारी भोजनाची मेजवानी देण्यात आल्याने शाकाहाराचे खंदे पुरस्कर्ते आणि ‘सर्व जीव मंगल प्रतिष्ठान’चे संस्थापक डॉ. कल्याण गंगवाल यांनी समाधान व्यक्त केले. भारतीय खाद्यसंस्कृतीतील समृद्ध शाकाहारी परंपरेचे दर्शन आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर घडवून आणणे ही अभिमानाची बाब असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

ब्रिक्स परिषदेदरम्यान आयोजित राजकीय स्नेहभोजनात भारतीय खाद्यपरंपरेतील विविध शाकाहारी पदार्थांचा समावेश करण्यात आला होता. खांडवी मिलेट, खुंब गलौटी, पनीर लबाबदार, गुच्छी मार्मिक, बाजरा पुलाव, चुकंदर रायता, जलेबी आणि शहतूत फिरनी यांसारख्या पदार्थांनी या मेजवानीची शोभा वाढवली. भारतीय तृणधान्ये, स्थानिक धान्ये, भाज्या आणि पारंपरिक पाककलेचा सुरेख मिलाफ या मेनूमधून पाहायला मिळाला. “शाकाहार हीच



भारताची संस्कृती असून, शुद्ध शाकाहारी आहार हा मानवासाठी योग्य आहार आहे. गेल्या पाच दशकांहून अधिक काळ मी आणि माझे सहकारी शाकाहार, जीवदया, पर्यावरणसंवर्धन आणि व्यसनमुक्तीसाठी कार्यरत आहोत. या चळवळीमुळे अनेक नागरिकांनी शाकाहाराचा स्वीकार केला आहे,” असे डॉ. गंगवाल यांनी सांगितले.

शाकाहाराच्या प्रचार-प्रसारासाठी सातत्याने कार्य करणाऱ्या डॉ. गंगवाल यांच्या मते, भारतातील मोठ्या वर्गाच्या आहारात शाकाहाराला महत्त्वाचे स्थान आहे. विशेषतः सण, उत्सव आणि धार्मिक कार्यक्रमांच्या वेळी शाकाहारी भोजनाला प्राधान्य दिले जाते.

## कृत्रिम बुद्धिमत्ता च्या वेग व बदलांवर चर्चा करा : दीपक शिंगण

■ पुणे (दै. संध्या)

कृत्रिम बुद्धिमत्ता युगातील बदलांवर चिकित्सक पद्धतीने लक्ष ठेवून विद्यार्थ्यांनी याविषयी सतत जिज्ञासा ठेवावी, नव कल्पनांना प्रोत्साहन द्यावे आणि तांत्रिक घडामोडींचा सातत्याने अभ्यास करावा. भारताला जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात नेतृत्व करण्याची मोठी संधी असून त्यासाठी विद्यार्थ्यांनी नवोन्मेषी दृष्टिकोन स्वीकारावा, असे क्रिस्टा चे सीनियर डायरेक्टर ऑफ इंजिनिअरिंग दीपक शिंगण यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या साते, मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ मध्ये स्कूल ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स च्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक वर्ष २०२६-२७ प्रथम वर्ष 'दीक्षारंभ' आयोजित करण्यात आला. यावेळी अक्कॉप्स सिस्टीम्स चे सह-संस्थापक विजेंद्र यादव, स्केल्ड एजिल ट्रान्सफॉर्मेशनचे सीनियर व्हाइस प्रेसिडेंट डॉ. महेंद्र रामदासी, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे आदी उपस्थित होते.

## अभियंता दिनानिमित्त लीला पूनावाला, आनंद देशपांडे, जे. पी. श्रॉफ यांचा सन्मान

■ पुणे (दै. संध्या)

भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त १५ सप्टेंबर रोजी साजरा होणाऱ्या अभियंता दिनाचे औचित्य साधून रोटरी जिल्हा ३१३१ आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योजक यांच्या वतीने उद्योग, तंत्रज्ञान, कौशल्यविकास आणि समाजोपयोगी कार्यात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या पद्मश्री लीला पूनावाला, पर्सिस्टंट सिस्टिम्सचे संस्थापक डॉ. आनंद देशपांडे आणि जे.पी.श्रॉफ यांना अभियंता दिन पुरस्काराने गौरविण्यात आले.

पद्मश्री लीला पूनावाला यांना उद्योगक्षेत्रातील प्रेरणादायी कारकीर्द



तसेच तरुणी आणि विद्यार्थिनींच्या शिक्षण व सक्षमीकरणासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल सन्मानित करण्यात आले.

डॉ. आनंद देशपांडे यांना भारताच्या तंत्रज्ञान आणि नवोन्मेष क्षेत्राला दिलेल्या योगदानासाठी,तसेच जागतिक स्तरावर भारताची ओळख निर्माण करणारी तंत्रज्ञान कंपनी उभारल्याबद्दल गौरविण्यात आले.

# सुमीत फॅसिलिटीजकडून भीमा नदीच्या पवित्र उगमस्थळाची स्वच्छता

■ पुणे (दै. संध्या)

सुमीत फॅसिलिटीजने पुणे जिल्ह्यातील श्री भीमाशंकर ज्योतिर्लिंग मंदिर परिसर येथे विशेष ‘स्वच्छता सप्ताह’ राबवला. २ सप्टेंबर ते ११ सप्टेंबर २०२६ या कालावधीत,श्रावण महिन्याच्या समारोपाच्या पार्श्वभूमीवर ही स्वच्छता मोहीम राबवण्यात आली.

सुमीत फॅसिलिटीजने स्वतः पुढाकार घेत ही स्वच्छता मोहीम सातत्याने राबवली. भीमा नदीच्या उगमस्थळासह मंदिर परिसरातून वाहणाऱ्या नदीच्या प्रवाहाची विशेष स्वच्छता करण्यात आली. उगमस्थळी साचलेला गाळ, प्लास्टिक कचरा आणि भाविकांकडून अर्पण करण्यात आलेले निर्माल्य काढून परिसर स्वच्छ करण्यात आला.

या मोहिमेसाठी २५ ते ३० सफाई कर्मचारी आणि ३ पर्यवेक्षक, तसेच स्वतंत्र देखरेख वाहन, कचरापेट्या, झाडू व इतर स्वच्छता साहित्य, कचऱ्याच्या पिशव्या आणि वैयक्तिक सुरक्षा साधने (PPE किट्स) उपलब्ध करून देण्यात आली. मोहिमेदरम्यान कचरा व प्लास्टिक संकलन, मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यांची आणि परिसराची स्वच्छता, कचऱ्याची विल्हेवाट तसेच नाल्यांची स्वच्छता अशी विविध कामे करण्यात आली.

श्रावण महिन्यात भाविकांची मोठी गर्दी होत असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात कचरा जमा होत होता. सुमीत फॅसिलिटीजच्या पथकाने दररोज ३० ते ३५ कचरापेट्यांमधील कचरा, प्लास्टिक आणि निर्माल्याचे संकलन करून त्याची विल्हेवाट लावण्याचे काम केले. मुंबईतील जुहू आणि वरळी समुद्रकिनाऱ्यांवरील स्वच्छता उपक्रमानंतर सुमीत फॅसिलिटीजने भीमाशंकर येथेही स्वच्छता मोहीम राबवली. महाराष्ट्रातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या भीमाशंकर तीर्थक्षेत्रात स्वच्छता आणि सार्वजनिक सेवेसाठी सुमीत फॅसिलिटीजने पुढाकार घेतला.

सुमीत ग्रुप एंटरप्रायझेसचे कार्यकारी अध्यक्ष श्री. सुमित साळुंके म्हणाले,



“भीमाशंकर हे केवळ आध्यात्मिक महत्त्व असलेले तीर्थक्षेत्र नाही, तर याच ठिकाणाहून भीमा नदीचा प्रवास सुरू होतो. त्यामुळे या पवित्र स्थळाची आणि जीवनदायी नदीच्या उगमाची काळजी घेणे, ही आमच्यासाठी खरी सेवा आहे.

आमची ही स्वच्छता मोहीम केवळ कचरा हटवण्यापुरती मर्यादित नव्हती, तर श्रद्धा, पर्यावरण आणि समाजाप्रती असलेल्या आपल्या सामूहिक जबाबदारीचा आदर व्यक्त करण्याचा हा एक प्रयत्न होता. सुमीत ग्रुपमध्ये स्वच्छता हीदेखील सेवेचेच एक रूप मानले जाते, म्हणजेच स्वतःपेक्षा मोठ्या गोष्टीची निःस्वार्थपणे काळजी घेणे.

भीमाशंकर येथे केलेल्या आमच्या याप्रयत्नातून अधिक जागरूकता निर्माण होईल आणि आपल्या धार्मिक स्थळांसोबतच नैसर्गिक वारशाचे स्वच्छता व संरक्षण करण्यासाठी सर्वांना प्रेरणा मिळेल, अशी आम्हाला आशा आहे.” सुमीत ग्रुप एंटरप्रायझेस ही भारतातील बिझनेस सर्व्हिसेस क्षेत्रातील आघाडीची कंपनी असून, देशातील २० हून अधिक राज्यांमध्ये तिचे कार्यक्षेत्र आहे आणि ५०,००० हून अधिक कर्मचाऱ्यांचा समूह आहे.

समूह फॅसिलिटीज मॅनेजमेंट, कचरा व्यवस्थापन, सुरक्षा सेवा आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा यांसह विविध क्षेत्रांमध्ये सेवा प्रदान करतो.

## थोडक्यात पण महत्वाचे




### पुण्यात आपत्कालीन वैद्यकीय सेवांना मिळणार बळकटी

**पुणे : दैनिक संध्या**

पुणे आणि परिसरातील नागरिकांना आपत्कालीन परिस्थितीत वेळेवर आणि अत्यावश्यक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने बिलियन हार्ट्स बीटिंग फाउंडेशन, अपोलो हॉस्पिटल्स आणि मार्श इंडिया यांनी संयुक्तपणे अत्याधुनिक लाइफ-सपोर्ट स्मार्ट ॲम्ब्युलन्स सेवेत दाखल केली आहे. मार्श इंडियाच्या सामाजिक उत्तरदायित्व उपक्रमांतर्गत या प्रकल्पाला आर्थिक पाठबळ मिळाले असून, बिलियन हार्ट्स बीटिंग फाउंडेशन प्रकल्पाची अंमलबजावणी करीत आहे. अपोलो हॉस्पिटल्सकडून वैद्यकीय आणि आपत्कालीन उपचारांबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन दिले जात आहे. आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यानंतर रुग्णाला रुग्णालयात दाखल करेपर्यंतच्या अत्यंत महत्त्वाच्या कालावधीत तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध व्हावी, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. विशेष वैद्यकीय शिबिरांसाठी ही ॲम्ब्युलन्स पुण्यात यापूर्वीच तैनात करण्यात आली असून, त्याद्वारे आपत्कालीन परिस्थितीतील सज्जता वाढविण्याबरोबरच आरोग्यसेवा नागरिकांच्या अधिक जवळ नेण्याचा प्रयत्न केला जात आहे. या प्रसंगी अपोलो हॉस्पिटल्स, पुणेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. राकेश शाह म्हणाले, "रुग्णालयाच्या आत आणि बाहेर आपत्कालीन उपचारांची संपूर्ण साखळी अधिक सक्षम करणे ही आमची कायमची बांधिलकी आहे. अत्याधुनिक लाइफ-सपोर्ट ॲम्ब्युलन्समुळे आपत्कालीन परिस्थितीतील सुरुवातीच्या महत्त्वाच्या मिनिटांमध्ये रुग्णांपर्यंत पोहोचण्याची क्षमता अधिक मजबूत होईल. कॉर्पोरेट बांधिलकी, समुदाय-केंद्रित अंमलबजावणी आणि वैद्यकीय तज्ज्ञता एकत्र आल्यास आरोग्यविषयक महत्त्वाच्या गरजा प्रभावीपणे पूर्ण करता येतात, हे या भागीदारीतून दिसून येते." बिलियन हार्ट्स बीटिंग फाउंडेशनच्या सीएसआर कामकाजाच्या प्रमुख सुधा झिजारिया म्हणाल्या, "आरोग्यसेवा रुग्णालयाच्या भिंतींच्या पलीकडे नेऊन ती समुदायांच्या अधिक जवळ पोहोचवणे हा आमचा प्रयत्न आहे. प्रकल्प अंमलबजावणी भागीदार म्हणून या उपक्रमातून प्रत्यक्ष आणि मोजता येण्याजोगा परिणाम साधण्यास आम्ही कटिबद्ध आहोत.

### फ्लिपकार्टकडून या सणासुदीच्या काळात २.५ लाखांहून अधिक रोजगार संधींची निर्मिती

**पुणे : दैनिक संध्या**

फ्लिपकार्ट या भारतातील स्वदेशी ई-कॉमर्स मार्केटप्लेसने आज सणासुदीच्या काळासाठी गिग कर्मचाऱ्यांसह २.५ लाखांहून अधिक प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार संधी निर्माण केल्याची घोषणा केली. यापैकी जवळपास ७५,००० संधी म्हणजेच सुमारे ३० टक्के जागा कर्मचारीवर्गामध्ये पहिल्यांदाच प्रवेश करणाऱ्यांसाठी आहेत, याद्वारे भारतातील विविध समाजघटकांसाठी रोजगाराचे नवे मार्ग खुले झाले आहेत. या संधी देशभरातील ७,००० हून अधिक ईकार्ट केंद्रांमध्ये पसरलेल्या आहेत, ज्यामध्ये फुलफिलमेंट सेंटर्स, वर्गीकरण केंद्रे (सॉर्टेशन हब्स) आणि शेवटच्या टप्प्यातील वितरण (लास्ट-माईल डिलिव्हरी) ऑपरेशन्सचा समावेश आहे. ९०० हून अधिक नवीन फेस्टिव्ह वितरण केंद्रे (डिलिव्हरी हब्स) आणि शेवटच्या टप्प्यातील वितरणासाठी जवळपास १.४ लाख अतिरिक्त रोजगार संधींसह फ्लिपकार्ट 'बिग बिलियन डेज'पूर्वी ग्राहकांच्या वाढत्या मागणीची पूर्तता करण्यासाठी आपले वितरण जाळे विस्तारत आहे. या हंगामात निर्माण झालेल्या एकूण नवीन रोजगारांपैकी ६० टक्के वाटा शेवटच्या टप्प्यातील वितरण संधींचा आहे, ज्यामधून फ्लिपकार्ट मिनिट्सचा विस्तार, तसेच द्वितीय आणि तृतीय श्रेणीच्या शहरांमधील वाढती मागणी दिसून येते. हा विस्तार फ्लिपकार्टच्या सप्लाय चेनमध्ये महिला आणि विकलांग व्यक्तींसाठीही मोठ्या प्रमाणावर संधी निर्माण करत आहे. सप्लाय चेनमधील भूमिकांमध्ये आता महिलांचे प्रमाण २० टक्क्यांहून अधिक झाले आहे, तर गोदाम (वेअरहाऊस) आणि वितरण कामांमध्ये विकलांग व्यक्तींचा सहभागही वाढला आहे.

# साउंड व्यावसायिकांचा जिल्हाधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा

## कारवाई थांबविण्यासह जप्त केलेली साधने परत करण्याच्या मागणीसह समान नियमावली लागू करण्याची मागणी




**■ पुणे (दै. संध्या)**

साउंड, डीजे, लाईट, मंडप, इव्हेंट आणि संबंधित व्यवसायांवर होत असलेल्या कारवाईच्या निषेधार्थ पुणे जिल्हा साउंड, लाईट अँड जनरेटर ओनर्स असोसिएशनच्या वतीने बुधवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर मूक मोर्चा काढण्यात आला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक पुणे स्टेशन ते जिल्हाधिकारी कार्यालय असा हा मोर्चा निघाला. व्यावसायिकांवरील अन्यायकारक कारवाई थांबवावी, जप्त केलेली साउंड साधने तातडीने परत करावीत आणि व्यवसायासाठी स्पष्ट व समान नियमावली लागू करावी, अशा मागण्या करण्यात आल्या. असोसिएशनचे अध्यक्ष गणेश काळभोर, उपाध्यक्ष सागर सुतार, सचिव राजू सोनावणे, खजिनदार मनोज भोसले, रिपब्लिकन परिवर्तन पँथरचे संस्थापक गजेंद्र मोरे यांच्या नेतृत्वात हजारो व्यावसायिक रस्त्यावर उतरले.

साउंड व्यावसायिकांनी कायद्याचे पालन करून व्यवसाय करण्याची तयारी दर्शविली आहे. मात्र, नियम व अटींचे पालन करूनही होणारी कारवाई, साउंड सिस्टिम जप्त करणे आणि साहित्य जप्त करण्याच्या पद्धतीमुळे व्यावसायिक तसेच त्यांच्यावर अवलंबून असलेल्या कुटुंबांवर आर्थिक संकट निर्माण झाले आहे. साउंड व्यावसायिकांना कायद्याच्या चौकटीत व्यवसाय करण्याची संधी द्यावी, जप्त केलेली साधने नियमानुसार तातडीने परत करावीत आणि अन्यायकारक कारवाई थांबवावी, या आमच्या प्रमुख मागण्या असल्याचे असोसिएशनचे अध्यक्ष गणेश काळभोर यांनी सांगितले. विद्यानंद बापट हे काही उच्च न्यायालय किंवा सर्वोच्च न्यायालय नाही, त्यांनी माध्यमांमधून ज्याप्रमाणे उत्सवांचे वातावरण गढूळ केले, तो प्रकार निषेधार्ह आहे. त्यांना विधायक व धोरणात्मक काही करायचे होते, तर न्यायालयात जायला हवे होते, असेही त्यांनी नमूद केले.

साउंड व्यावसायिकांच्या अडचणींबाबत शासन व प्रशासनाने तातडीने बैठक घेऊन सकारात्मक तोडगा काढावा, अशी मागणीही करण्यात आली. तसेच ढोलताशा पथक, बँड पथक, हलगी पथक, सनई-चौघडे व तुतारी यांना डेसिबलच्या मुद्द्यावर सूट दिली जाते, तशीच सूट आम्हालाही मिळावी. कारवाई करायची असेल, तर सर्वांना समान न्याय द्यावा. एखाद्या व्यवसायावर बंदी किंवा जप्ती आणून आमच्यावर बेरोजगारी व उपासमारीची वेळ आणू नये, अशी मागणी सागर सुतार यांनी केले. ध्वनी प्रदूषणाच्या नियमांमुळे साऊंड सिस्टीम व्यावसायिकांवर उपासमारीची वेळ आली असून, प्रशासनाने परवानगी न दिल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही सागर सुतार यांनी दिला.

### साउंड व्यावसायिकांच्या प्रमुख मागण्या

- नियम व अटींचे पालन करणाऱ्या साउंड व्यावसायिकांवरील कारवाई थांबवावी
- जप्त केलेली साउंड साधने नियमानुसार तातडीने परत करावीत.
- साउंड व्यवसायासाठी स्पष्ट व समान नियमावली लागू करावी.
- व्यावसायिकांच्या अडचणींबाबत शासन व प्रशासनाने बैठक घेऊन सकारात्मक तोडगा काढावा.
- साउंड व्यावसायिकांचे काम वाजवून झाल्यानंतर दोन-तीन दिवसांनी घरी जाऊन साहित्य जप्त करू नये.
- नियमभंग झाल्यास जागेवर कारवाई करावी.
- साउंड सिस्टीमसाठी आवश्यक परवानग्यांची ऑनलाईन, एक खिडकी सुविधा द्यावी
- डेसिबल मोजणी अधिकृत उपकरणाद्वारेच करावी


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे शिरोली तर्फे आळे ता. जुन्नर जि. पुणे परिसरातील लोकांस सदरच्या नोटिसीने जाहीरपणे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही तिचे विद्यमान मालक लक्ष्मीबाई सोनभाऊ आतकरी रा. शिरोली तर्फे आळे, ता. जुन्नर जि. पुणे यांची मालकी व ताबे वहिवाटीची २ हे. ४० आर अशी मिळकत आहे. सदरची मिळकत ही यांनी आमचे अशिलांना विकण्याचे मान्य व कबूल केले आहे, त्याबाबत आमचे आशिलांबरोबर विक्री विषयाची बोलणी करून विक्री विषयीचा करारनामा करून दिला आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहित असल्याचा भरवसा सदर विद्यमान मालकांनी आमचे अशिलांना दिलेला आहे.

तथापि सदरील मिळकती संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध म्हणजेच गहाण, दान, लीज, बक्षिस, खरेदी विक्री, लीज लिन, चोळी बांगडी, पोटगी, साठेखत, खरेदीखत, इ. स्वरूपाचे वा इतर कोणत्याही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांत खालील पत्त्यावर योग्य त्या सबळ पुराव्यानिशी संपर्क साधावा व तशी खात्री करून द्यावी. अन्यथा सदरील मिळकत ही निर्वेध व निजोखमी अशी असून सदरील मिळकतीवर इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही व असल्यास त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिलेला आहे. असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील, मग मात्र कोणाचीही कसल्याही प्रकारची तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट

मिळकतीचे वर्णन - तु. पुणे पो. तु. जुन्नर ता. जुन्नर जिल्हा परिषद पुणे, पंचायत समिती जुन्नर महसुली गाव व ग्रा. पं. शिरोली तर्फे आळे हद्दीतील व मे. दुय्यम निबंधक सो. नारायणगाव यांचे कार्यक्षेत्रातील गाव मौजे शिरोली तर्फे आळे ता. जुन्नर येथील शेतजमीन मिळकत खाते नं. ३९८ वरील

गट नं. २७६/४ संपूर्ण, क्षेत्र २ हे. ४० आर आकार ६ रु. ७२ पैसे, यासी याच गट नंबर मध्ये असणारी संपूर्ण स्वतंत्र विहिरीचे हक्कासह शेतजमीन मिळकत.

यासी चतुःर्सिमा - पूर्व - ओढा, दक्षिण - ग.नं. २७७/२, पश्चिम ग.नं.२७६/३, उत्तर - ग.नं. २७२ -

येणेप्रमाणे वर्णनाची चतुःर्सिमापूर्वक मिळकत त्यामधील दगड, माती, तदंगभूत वस्तू, वहिवाटीचे व जाणे येणेचे हक्कासह इजमेंटरी मिळकत.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस

नारायणगाव
तारीख - १६/०९/२०२६

ॲड. ऋषिकेश रामदास गायकवाड
ॲडव्होकेट
बी.कॉम., एलएल.बी.
मोबाईल नं. ९५९५५ ९५९४५



## पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष

ई-निविदा जाहिरात - फेर निविदा जाहिरात

विक्री कालावधी दिनांक : दि. १७/०९/२०२६ ते दि. २३/०९/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत

स्विकृती दिनांक : दि. १७/०९/२०२६ ते दि. २३/०९/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत

तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : २४/०९/२०२६ ०३.०० दुपारी

| अ. क्र. | निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PMC/ ELECTRICAL/ 2026/10 | विद्युत विभाग | पुणे महानगरपालिकेचे मुंढवा मैलापाणी शुद्धीकरण केंद्रामधील सिवेज पंपिंग स्टेशन व SBR टेक्नोलॉजी करिता नव्याने PLC व स्काडा मिटीम व DO ऍनालायझर पुरविणे, बसविणे व चालू करून देणे. (पुणे मनपा अथवा शासकीय संस्थांचे रेजिस्ट्रेशन अट शिथिल) | 6079.00 | 5615854.00 | 56159.00 | ६ महिने | श्री. वैभव घुले 7447472413 |
| 2 | PMC/ ELECTRICAL/ 2026/11 | विद्युत विभाग | पुणे महानगरपालिकेचे खराडी मैलापाणी शुद्धीकरण केंद्रामधील सिवेज पंपिंग स्टेशन व SBR टेक्नोलॉजी करिता नव्याने PLC व स्काडा सिस्टीम व DO ऍनालायझर पुरविणे, बसविणे व चालू करून देणे. (पुणे मनपा अथवा शासकीय संस्थांचे रेजिस्ट्रेशन अट शिथिल) | 6079.00 | 5615854.00 | 56159.00 | ६ महिने | श्री. वैभव घुले 7447472413 |

निविदा संचाची विक्री www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सूचनेत नमूद केलेल्या तारखेनुसार सुरू राहील. सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे. www.mahatenders.gov.in

सदरची ई-निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल Support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462, 0120-4001002 या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

सही/-
कार्यकारी अभियंता (विद्युत)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/८२४ दि. १६/०८/२०२६



## पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष पाणीपुरवठा विभाग

निविदा जाहिरात - नविन कामे

विक्री कालावधी दिनांक : दि. १७/०९/२०२६ ०९:०० सकाळी ते २६/०९/२०२६ दु. २:३० दुपारी पर्यंत

स्विकृती दिनांक : दि. १७/०९/२०२६ ०९:०० सकाळी ते २६/०९/२०२६ दु. २:३० दुपारी पर्यंत

तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : २८/०९/२०२६ ३.०० दुपारी

| निविदा क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव/संपुर्ण तपशील | निविदा संच किंमत र. रूपये | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत (महिने) | अडचण असल्यास निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दुरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| PMC /WATER_ SUPPLY/2026/439 | पाणीपुरवठा | प्रभाग क्र. ३९ सुर्यमुखी सिद्धिविनायक मंदिर, अप्पर येथील दुषित पाणीपुरवठा होणाऱ्या लाईन बदलणे. | रु १३५९/- | रु २९६६०५२/- | रु २९६६१/- | ५ | विज्ञान गायकवाड ९८६०२८२७०५ |
| PMC /WATER_ SUPPLY/2026/440 | पाणीपुरवठा | प्रभाग क्र. ३९ मधील राजीव गांधी नगर, अप्पर डेपो, सुप्पर परिसरातील नवीन कुपनलिका टाकणे, दुषित पाणीपुरवठा होणाऱ्या कुपनलिका बदलणे. | रु ६०७९/- | रु ५५०७२५३/- | रु ५५०७३/- | ५ | विज्ञान गायकवाड ९८६०२८२७०५ |
| PMC /WATER_ SUPPLY/2026/441 | पाणीपुरवठा | पाणीपुरवठा विभाग दैनंदिन देखभाल दुरुस्तीकरिता आवश्यक ८० मिमी ते २०० मिमी व्यामाचे सि.आय. मेकॅनिकल फ्लॅंज सॉकेट टेलपीस पुरविणे. | रु ६०७९/- | रु ७७०२०००/- | रु ७७०२०/- | ३ | भाविका ठाकूर ९१३०५१२२११ |
| PMC /WATER_ SUPPLY/2026/442 | पाणीपुरवठा | पाणीपुरवठा विभाग दैनंदिन देखभाल दुरुस्तीकरिता आवश्यक २५० मिमी ते ४०० मिमी व्यासाचे सि.आय. मेकॅनिकल फ्लॅंज सॉकेट टेलपीस पुरविणे. | रु ६०७९/- | रु ७९९१४९०/- | रु ७९९१५/- | ३ | भाविका ठाकूर ९१३०५१२२११ |
| PMC /WATER_ SUPPLY/2026/443 | पाणीपुरवठा | पाणीपुरवठा विभाग मोठ्या व्यासाच्या जलवाहिन्यावरील व्हॉल्व्हच्या तातडीच्या दैनंदिन देखभाल दुरुस्तीकरिता आवश्यक विविध व्यासाचे सि.आय. मेकॅनिकल फ्लॅंज सॉकेट टेलपीस पुरविणे. | रु ६०७९/- | रु ५४९५३३०/- | रु ५४९५३/- | ३ | भाविका ठाकूर ९१३०५१२२११ |
| PMC /WATER_ SUPPLY/2026/444 | पाणीपुरवठा | पाणीपुरवठा विभाग दैनंदिन देखभाल दुरुस्तीकरिता मोठ्या व्यासचा व्हॉल्व्ह साठी आवश्यक गणमेटलचे (मणी) स्पिन्डल नात स्टेनलेस स्टील स्पिनडल (दांडा) पुरविणे | रु १३५९/- | रु २२७४८७०/- | रु २२७४९/- | ६ | भाविका ठाकूर ९१३०५१२२११ |

अ) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच www.mahatenders.gov.in या वेबसाईटवर पाहण्यासाठी उपलब्ध आहे. निविदा संचाची विक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
ब) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्यास याची सर्वस्व जबाबदारी टेंडरदाराची राहील.
क) ऑनलाइन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती टेंडर सेल विभाग पुणे म.न.पा. येथे मिळेल.
ड) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS/RTGS/NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

सही/-
श्री. नितिन खुडे (प्रभारी)
कार्यकारी अभियंता
पाणीपुरवठा
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्रमांक : २/८२५ दि. १६/०९/२०२६



## पुणे महानगरपालिका, पुणे

निविदा प्रक्रिया कक्ष

ई-निविदा जाहिरात - फेर निविदा जाहिरात

विक्री कालावधी दिनांक : दि. १७/०९/२०२६ ते दि. २८/०९/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत

स्विकृती दिनांक : दि. १७/०९/२०२६ ते दि. २८/०९/२०२६ ०२:३० दुपारी पर्यंत

तांत्रिक निविदा उघडणे प्रक्रिया दिनांक : २९/०९/२०२६ ०३.०० दुपारी

| अ. क्र. | निविदा क्रमांक | खात्याचे नाव | कामाचे नाव | निविदा संच किंमत रू. | अंदाजित पुर्व गणित रक्कम रू. | बयाणा रक्कम रू. | कामाची मुदत | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | PMC/ ELECTRICAL/ 2026/138 | विद्युत विभाग | पुणे महानगरपालिकेचे १८ दलली/दिन बोपोडी मैलापाणी शुद्धीकरण केंद्र ०१ वर्ष चालविणे व देखभाल दुरूस्तीची कामे करणे. | रू. ६०७९/- | रु. १४०२४८५५/- | रु. १४०२४९/- | १२ महिने | प्रल्हाद ताराचंद पवार ९६८९९३७६९७ |

निविदा संचाची विक्री www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सूचनेत नमूद केलेल्या तारखेनुसार सुरू राहील. सविस्तर निविदा व निविदेबाबतची इतर माहिती खालील संकेत स्थळावर उपलब्ध आहे. www.mahatenders.gov.in

सदरची ई-निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास NIC यांचेकडील ई-मेल Support-eproc@nic.in अथवा Help Desk Number 0120-4200462, 0120-4001002 या दूरध्वनीवर संपर्क साधावा.

सही/-
कार्यकारी अभियंता (विद्युत)
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. २/८२३ दि. १६/०९/२०२६


### 'सा रे ग म प'चे भव्य पुनरागमन

**■ मुंबई (दै. संध्या)**

गायन रिॲलिटी कार्यक्रमांच्या विश्वातील लोकप्रिय आणि प्रतिष्ठित नाव असलेला 'सा रे ग म प' नव्या पर्वासह पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. 'हिंदुस्तान का संगीतस्थान' या संकल्पनेवर आधारित या नव्या पर्वाची घोषणा मुंबईत आयोजित विशेष पत्रकार परिषदेत करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाच्या भव्य नव्या मंचाची झलक अत्याधुनिक आभासी वास्तव अनुभवाच्या माध्यमातून माध्यम प्रतिनिधींना दाखवण्यात आली. 'सा रे ग म प २०२६'चा पहिला भाग १९ सप्टेंबर २०२६ रोजी प्रसारित होणार असून दर शनिवार आणि रविवार रात्री ९.३० वाजता हा कार्यक्रम झी टीव्ही आणि हिंदी झी५वर पाहता येणार आहे. जवळपास तीन दशकांची समृद्ध परंपरा लाभलेल्या 'सा रे ग म प'ने अस्सल संगीत आणि नवोदित गायक प्रतिभेला व्यासपीठ देण्याची आपली परंपरा कायम ठेवली आहे. मात्र, यंदाच्या पर्वात पारंपरिक गायन स्पर्धेपलीकडे जाऊन प्रेक्षकांना एका भव्य संगीतसोहळ्याचा अनुभव देण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. कार्यक्रमासाठी उभारण्यात आलेला ३६० अंशांचा भव्य मंच, १०० हून अधिक संगीतकार आणि विशाल कोरस समूहाची उपस्थिती हे यंदाच्या पर्वाचे विशेष आकर्षण आहे. त्यामुळे दूरचित्रवाणीवरील कार्यक्रमाऐवजी प्रत्यक्ष संगीत मैफलीचा अनुभव प्रेक्षकांना मिळणार आहे. देशाच्या विविध भागांतील संगीत परंपरा, सांगीतिक वैविध्य आणि भारतीय संगीताचा समृद्ध वारसा सादरीकरणातून उलगडला जाणार आहे. या पर्वात संगीत क्षेत्रातील चार दिग्गज गुरु सहभागी झाले आहेत.


स्वच्छ सर्वेक्षण २०१८ मध्ये नाविण्यपुर्ण उपक्रमासाठी भारतात प्रथम पुरस्कार प्राप्त नगरपरिषद

स्वच्छ सर्वेक्षण २०२३ मध्ये भारतात प्रथम क्रमांक प्राप्त नगरपरिषद

सासवड नगरपरिषद कार्यालय
सासवड, ता. पुरंदर, जि. पुणे
Email ID- saswadmc@gmail.com
फोन नं :- ०२११५-२२२३४९,२२२४३७

जावक क्र. बा.वि./३०९०/२०२६ | दिनांक : १६/०९/२०२६

## सासवड नगरपरिषद कार्यालय, जि. पुणे
## जाहिर दरपत्रक/कोटेशन

सासवड नगरपरिषदेमधील बांधकाम विभागामध्ये पार्टिशन करणे या कामासाठी जिल्हा दर सुची मध्ये नसलेल्या बाबींसाठी बाजारभाव दर जी.एस.टी रक्कम सहीत मागविणेत येत आहेत. तरी इच्छुक पात्रता धारकांनी खालील तक्त्यामध्ये सदर कामांचा तपशील घेऊन आपले दरपत्रक/कोटेशन स्वतंत्र सिलबंद लिफाफ्यात नगरपरिषदेमध्ये दि. १७/०९/२०२६ पासून दि. २४/०९/२०२६ रोजी सांयकाळी ०५.०० वाजेपर्यत सादर करावे. जाहिर दरपत्रक/कोटेशन स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार नगरपरिषदेने राखुन ठेवला आहे. याबाबत कोणतेही कारण दिले जाणार नाही.

| अ. नं. | कामाचा तपशील | नग | रक्कम |
|---|---|---|---|
| १ | FURNITURE WORK (Cabin) | SQFT | |
| | A) Partition (18mm plywood with wooden frame and laminate work on both side including glass) | SQFT | |
| | B) Wall Panelling (12mm plywood with wooden framing and laminate on one side) | SQFT | |
| | C) Toughen Glass Door (12mm glass with fitting and hardware) | SQFT | |
| | एकूण | | |
| | जी.एस.टी.रक्कम १८% | | |
| | एकूण रक्कम | | |

शिक्का

सही/-
(डॉ. कैलास चव्हाण)
मुख्याधिकारी
सासवड नगरपरिषद, सासवड





## थोडक्यात पण महत्वाचे



### पिंपरीत संदीप वाघेरे यांच्या विसर्जन केंद्रावर दीड दिवसांच्या गणरायाला भावपूर्ण निरोप

**पिंपरी : दैनिक संध्या**

गणेशोत्सवातील दीड दिवसांच्या गणेशमूर्तींचे विसर्जन पिंपरी येथे नगरसेवक संदीप वाघेरे यांच्या पुढाकारातून उभारण्यात आलेल्या गणेशमूर्ती विसर्जन व संकलन केंद्रावर भक्तीमय वातावरणात पार पडले. नागरिकांनी मोठ्या संख्येने या केंद्राचा वापर करून आपल्या लाडक्या गणरायाला भावपूर्ण निरोप दिला. गेल्या सहा वर्षांपासून संदीप वाघेरे यांच्या वतीने गणेशमूर्ती विसर्जन व संकलन केंद्राचा उपक्रम सातत्याने राबविण्यात येत आहे. यंदाही नागरिकांना सुरक्षित, सुलभ आणि पर्यावरणपूरक विसर्जनाची सुविधा मिळावी, यासाठी केंद्रावर दोन स्वतंत्र विसर्जन हौद उभारण्यात आले आहेत. तसेच गणेशमूर्ती संकलनासाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. विसर्जनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी आरतीची विशेष व्यवस्था, साउंड सिस्टीम, पिण्याचे स्वच्छ पाणी, पुरेशी प्रकाश व्यवस्था, स्वच्छता, निर्माल्य संकलन, कचरा संकलन तसेच दिशादर्शक फलकांची व्यवस्था करण्यात आली होती. गर्दीचे नियोजन आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी स्वयंसेवकांचीही नियुक्ती करण्यात आली होती. दीड दिवसांच्या गणेशमूर्तींच्या विसर्जनावेळी नागरिकांनी पर्यावरणपूरक पद्धतीने विसर्जनाला प्राधान्य दिले. ज्येष्ठ नागरिक, महिला आणि लहान मुलांसह येणाऱ्या कुटुंबांना स्वयंसेवकांकडून आवश्यक मार्गदर्शन करण्यात आले. त्यामुळे विसर्जन प्रक्रिया कोणतीही गैरसोय न होता शिस्तबद्ध पद्धतीने पार पडली. नागरिकांकडून संकलित करण्यात आलेल्या गणेशमूर्तींचे महापालिकेने निश्चित केलेल्या अधिकृत ठिकाणी शास्त्रोक्त पद्धतीने विसर्जन करण्यात येणार आहे. नदी, नाले किंवा अन्य जलस्रोतांमध्ये मूर्ती विसर्जित न करता संकलन केंद्राचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. "गणेश भक्तांच्या श्रद्धेचा सन्मान राखत सुरक्षित, सुलभ आणि पर्यावरणपूरक विसर्जनाची सुविधा उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. गेल्या सहा वर्षांपासून हा उपक्रम अखंडितपणे सुरू असून, दीड दिवसांच्या गणरायाचे विसर्जन भक्तीमय वातावरणात पार पडले. आगामी विसर्जनाच्या दिवसांतही नागरिकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा," असे आवाहन नगरसेवक संदीप वाघेरे यांनी केले.

### ज्येष्ठ पत्रकार शिवाजीराव शिर्के यांचे निधन

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी चिंचवड शहरातील ज्येष्ठ पत्रकार व लेखक शिवाजीराव अमृतराव शिर्के (वय ८१ वर्षे) यांचे मंगळवारी (दि.१५ सप्टेंबर) निधन झाले. शिवाजीराव शिर्के यांनी पुणे जिल्हा गुणवंत कामगार विकास समिती, पिंपरी चिंचवड पत्रकार संघ, फुगेवाडी ज्येष्ठ नागरिक संघ आदी संस्थांचे अध्यक्षपद भूषवले आहे. पिंपरी चिंचवड पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रवीण शिर्के यांचे ते वडील होत. तसेच ओबीसी कल्याण विभागाचे सहसंचालक प्रशांत शामराव शिर्के यांचे ते चुलते होत. त्यांच्या मागे पत्नी, एक मुलगा, दोन विवाहित मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे. शिवाजीराव शिर्के यांनी प्रवीण प्रकाशन या संस्थेच्या माध्यमातून "महाराणी येसूबाई यांचा इतिहास" हे पुस्तक प्रकाशित केले असून या पुस्तकाला 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड' हे पारितोषिक मिळाले आहे. तसेच 'राजे शिर्के घराण्याचा इतिहास', 'कृष्णाकाठ ते पवनाकाठ' हे आत्मचरित्र कालभैरव, शिरकाण आदी पुस्तके आणि अनेक कवितासंग्रह प्रकाशित केले आहेत. सातारा जिल्ह्यातील उद्योजकांचा परिचय करून देणारे 'सातारचे रत्न' हे देखील त्यांचे गाजलेले पुस्तक आहे. 'पराचा कावळा', 'ही पैशाची किमया' आदी नाटकांचेही त्यांनी लेखन केले आहे. शिवाजीराव शिर्के यांचा अंत्यविधी उद्या बुधवारी सकाळी १०:३० वाजता, फुगेवाडी स्मशानभूमी येथे होणार आहे.

### गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी पुणे मेट्रोला उदंड प्रतिसाद

**पिंपरी : दैनिक संध्या**

गणेशोत्सवाच्या उत्सवी वातावरणात पुणेकरांनी वाहतूक कोंडीला पर्याय म्हणून पुणे मेट्रोला मोठी पसंती दिली आहे. गणेशोत्सवाच्या पहिल्याच दिवशी (१४ सप्टेंबर) तब्बल २ लाख ६२ हजार ६७१ प्रवाशांनी पुणे मेट्रोने प्रवास केला. गतवर्षीच्या तुलनेत यावर्षीच्या प्रवासी संख्येत ४६ हजार २९७ प्रवाशांची वाढ झाली असून, एकूण प्रवासी संख्येत २१.४० टक्क्यांची वाढ नोंदविण्यात आली आहे. गणेशोत्सव काळात भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन पुणे मेट्रो प्रशासनाने विशेष नियोजन केले आहे. प्रवाशांचा प्रवास अधिक सुलभ व आरामदायी व्हावा यासाठी मेट्रो गाड्यांची वारंवारता वाढवून दर पाच मिनिटांनी सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. यामुळे शहरातील प्रमुख गणेश मंडळांकडे जाणाऱ्या भाविकांना मोठा दिलासा मिळाला आहे. रात्री ११ वाजेपर्यंतच्या आकडेवारीनुसार महात्मा फुले मंडई मेट्रो स्थानकावर सर्वाधिक ५१ हजार ५३३ प्रवाशांची नोंद झाली. तर इंटरचेंज केंद्र असलेल्या जिल्हा न्यायालय (डिस्ट्रिक्ट कोर्ट) स्थानकावर ५८ हजार १४८ प्रवाशांनी प्रवास केला. या दोन्ही स्थानकांवर गतवर्षीच्या तुलनेत सुमारे २२ टक्क्यांपर्यंत वाढ दिसून आली. याशिवाय पीसीएमसी स्थानकावर २५ हजार ४२९, रामवाडी स्थानकावर २३ हजार ६४४, स्वारगेट स्थानकावर २१ हजार ९१ आणि पीएमसी स्थानकावर १९ हजार २६७ प्रवाशांची नोंद झाली. गणेशोत्सवाच्या कालावधीत भाविकांना रात्री उशिरापर्यंत गणपती दर्शन घेता यावे यासाठी पुणे मेट्रोने विशेष विस्तारित वेळापत्रक लागू केले आहे. तसेच कसबा पेठ, स्वारगेट, पीएमसी, डेक्कन जिमखाना आणि छत्रपती संभाजी महाराज उद्यान या स्थानकांचा वापर करण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. गर्दीचे प्रभावी नियोजन करण्यासाठी महात्मा फुले मंडई मेट्रो स्थानकाचा वापर प्रामुख्याने परतीच्या प्रवासासाठी करावा, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

### 'आशीर्वाद का दीया' उपक्रम

**पिंपरी : दैनिक संध्या**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी पिंपरी-चिंचवड शहर जिल्ह्याच्या वतीने संपूर्ण महिनाभर 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येणार असून, त्याअंतर्गत १७ सप्टेंबर रोजी 'आशीर्वाद का दीया' हा विशेष उपक्रम आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमात शहरातील दोन लाखांहून अधिक नागरिकांनी हातात दिवे घेऊन पंतप्रधान मोदी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा व आशीर्वाद द्यावेत, असे आवाहन भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी केले आहे. भाजप शहर जिल्ह्याने या उपक्रमासाठी व्यापक नियोजन केले असून, 'आशीर्वाद का दीया' हा उपक्रम विक्रमी स्वरूपात पार पाडण्याचा संकल्प करण्यात आला आहे. या अभियानाचे शहर संयोजक म्हणून भाजप शहर जिल्हा महामंत्री मधुकर बच्चे यांची जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत रोजगार मेळावे, रक्तदान शिबिरे, आरोग्य शिबिरे, 'स्वप्नाचा भारत' उपक्रम, चित्रकला व भाषण स्पर्धा, नमो सेवा गाथा, अंगणवाडी सेविका सन्मान, विकासकामांवरील रील स्पर्धा, सेवादीप यात्रा, सेवा सेतू अभियान, रांगोळी स्पर्धा, विकसित भारत संकल्प यात्रा, इनोव्हेशन चॅलेंज आणि जनसेवेचा महाकुंभ यांसारखे विविध समाजोपयोगी व सेवाभावी कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.




# जबाबदार नागरिक घडविण्याचे काम शिक्षक करतात

■ पिंपरी : (दै. संध्या)

शिक्षक हे केवळ विद्यार्थ्यांना शिक्षण देत नाहीत, तर त्यांना संस्कारक्षम आणि जबाबदार नागरिक घडविण्याचे काम करतात. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शाळांमध्ये राबवण्यात येणारे शैक्षणिक उपक्रम हे कोणत्याही खासगी शाळेतील उपक्रमांपेक्षा कमी नाहीत. आज महापालिका शाळांमध्ये प्रवेश घेण्यासाठी पालकांच्या रांगा लागत आहेत. महापालिकेतील शिक्षकांनी देखील आपल्या कार्यातून महापालिका शाळांकडे पाहण्याचा सर्वांचाच दृष्टिकोन अधिक सकारात्मक करण्यासाठी प्रयत्न करावेत," असे प्रतिपादन आमदार शंकर जगताप यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाच्या वतीने नुकत्याच झालेल्या शिक्षक दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळ्यात केले.

चिंचवड येथील प्रा.रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्यासह उपमहापौर शर्मिला बाबर, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती राणीमाई पठारे यांच्यासह अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उपायुक्त ममता शिंदे, प्रशासन अधिकारी संगीता बांगर यांच्यासह शिक्षण समिती सदस्य व नगरसदस्य उपस्थित होते.

या कार्यक्रमात शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षक, मुख्याध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी असे एकूण ३८ जणांचा आमदार शंकर जगताप आणि महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करून गौरव करण्यात आला.

आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यावेळी म्हणाले, "प्रत्येकाच्या आयुष्यात शिक्षक महत्त्वाची भूमिका बजावतात. महापालिकेचा सर्वांत महत्त्वाचा विभाग म्हणजे शिक्षण विभाग आहे. शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्याला सुजाण नागरिक घडविण्याचे काम प्रत्येक शिक्षक करतात. सुजाण नागरिक घडविताना विद्यार्थ्यांची भावनिक बुद्धिमत्ता वाढविणे, तसेच विद्यार्थ्यांमधील चांगले गुण ओळखून त्यांना प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. शिक्षक हा केवळ विद्यार्थ्यांना विषयाचे ज्ञान देणारा घटक नसून त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासात महत्त्वाची भूमिका बजावतो. विद्यार्थ्यांच्या भावनिक, सामाजिक आणि बौद्धिक विकासासाठी शिक्षकांनी सातत्याने प्रयत्न करणे गरजेचे असल्याचेही त्यांनी नमूद केले.

शिक्षण समिती सभापती रविना आंगोळकर यांनीही यावेळी मनोगत व्यक्त केले. तसेच कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त ममता शिंदे यांनी केले.

शैक्षणिक कामकाजासोबतच प्रशासन आणि शाळांच्या दैनंदिन व्यवस्थेत महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्या कर्मचाऱ्यांचाही यावेळी विशेष पुरस्काराने सन्मान करण्यात आला. यामध्ये सहायक प्रशासन अधिकारी रजिया खान, पर्यवेक्षक जयमाला गावडे, सरस्वती भेगडे, प्रमिला जाधव, ज्योती तापकीर, सुजाता कर्जतकर, प्रमिला होले, श्रीकांत चौगुले, अंजली झगडे, खालेदा खान आणि सुनीता गिते यांना पुरस्कार देण्यात आला. पुरस्कार सोहळ्यानिमित्त विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले. पिंपळे गुरव शाळेतील विद्यार्थ्यांनी मंगळागौर नृत्य सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. रावेत शाळेतील शिक्षकांनी 'बाई पण भारी देवा' या गाण्यावर नृत्य सादर केले. या सादरीकरणातून दररोज कामावर जाणाऱ्या महिलांची व्यथा, त्यांचा संघर्ष आणि कुटुंबासाठी त्यांचे योगदान प्रभावीपणे मांडण्यात आले. तसेच थेरगाव शाळेतील शिक्षिका स्नेहल भोसले यांनी भरतनाट्यमच्या माध्यमातून गणेश वंदना सादर केली. विविध सांस्कृतिक सादरीकरणांमुळे पुरस्कार सोहळ्याला उत्साहपूर्ण वातावरण लाभले. तसेच कार्यक्रमात प्रसिद्ध व्याख्याते आणि करिअर समुपदेशक विवेक वेलणकर यांच्या व्याख्यानाचेही आयोजन करण्यात आले. त्यांनी बदलत्या शैक्षणिक वातावरणात विद्यार्थ्यांसमोरील करिअरच्या विविध संधी, योग्य करिअर निवड आणि भविष्यातील आव्हाने याबाबत मार्गदर्शन केले. शिक्षकांच्या कार्याचा गौरव, विद्यार्थ्यांचे सांस्कृतिक सादरीकरण आणि मार्गदर्शनपर व्याख्यान यामुळे शिक्षक दिनानिमित्त आयोजित आदर्श शिक्षक पुरस्कार सोहळा उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. शिक्षक हे समाजाच्या जडणघडणीतील अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान न देता त्यांच्यामध्ये संस्कार, शिस्त, सामाजिक बांधिलकी आणि आत्मविश्वास निर्माण करण्याचे काम शिक्षक करतात. महापालिका शाळांमधील शिक्षकांनी आपल्या गुणवत्तापूर्ण कार्यातून विद्यार्थ्यांना घडविण्यासोबतच महापालिका शाळांची गुणवत्ता आणि विश्वासार्हता अधिक उंचावण्यासाठी सातत्याने प्रयत्न करावेत. उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शिक्षकांचा सन्मान हा इतर शिक्षकांसाठीही प्रेरणादायी ठरेल.

#### विविध विभागातील शिक्षक व कर्मचाऱ्यांचा गौरव

शिक्षक दिनानिमित्त आयोजित या पुरस्कार सोहळ्यात विविध विभागांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि प्रशासनातील कर्मचाऱ्यांचा गौरव करण्यात आला. आदर्श बालवाडी शिक्षिका पुरस्काराने वंदना पराते, संगीता इंगळे आणि राजश्री वाळुंज यांचा सन्मान करण्यात आला. आदर्श शिक्षक – प्राथमिक विभाग या पुरस्काराने सुरेखा कुंजीर, वीणा दाभाडे, मनीषा पिंगळे, राजश्री रासकर, योगेश्वरी लोणकर, ज्योती गिरी, सविता कांबळे, सुनीता बामणे, सुनीता दहिफळे, वंदना जगनाडे, बाळासाहेब जाधव आणि प्रतिभा नेवकर यांचा गौरव करण्यात आला. विशेष पुरस्काराने पूजा कदम आणि सुनिला दिवाणे यांचा सन्मान करण्यात आला. आदर्श शिक्षक – माध्यमिक विभाग या पुरस्काराने कविता पाचरणे, नसिफा शेख, अपर्णा चिंचोलकर, रुपाली गाथा, दामहे नूतनलाल आणि विद्या मिसाळ यांचा गौरव करण्यात आला. खासगी विभागातील आदर्श शिक्षक पुरस्काराने मनीषा कलशेट्टी आणि विजयश्री काजळे यांचा सन्मान करण्यात आला. तसेच मनपा व संस्था संचलित शाळांमधील आदर्श शिक्षक पुरस्काराने सुप्रिया पाटील आणि गोकुळ पवार यांचा गौरव करण्यात आला.

## स्कूल ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्सचा दीक्षारंभ संपन्न

■ पिंपरी (दै. संध्या)

कृत्रिम बुद्धिमत्ता युगातील बदलांवर चिकित्सक पद्धतीने लक्ष ठेवून विद्यार्थ्यांनी याविषयी सतत जिज्ञासा ठेवावी, नव कल्पनांना प्रोत्साहन द्यावे आणि तांत्रिक घडामोडींचा सातत्याने अभ्यास करावा. भारताला जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात नेतृत्व करण्याची मोठी संधी असून त्यासाठी विद्यार्थ्यांनी नवोन्मेषी दृष्टिकोन स्वीकारावा, असे क्रिस्टा चे सीनियर डायरेक्टर ऑफ इंजिनिअरिंग दीपक शिंगण यांनी सांगितले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या साते, मावळ येथील पिंपरी चिंचवड विद्यापीठ मध्ये स्कूल ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्स च्या विद्यार्थ्यांचा शैक्षणिक वर्ष २०२६-२७ प्रथम वर्ष 'दीक्षारंभ' आयोजित करण्यात आला.

यावेळी अक्कॉप्स सिस्टीम्स चे सह-संस्थापक विजेंद्र यादव, स्केल्ड एजिल ट्रान्सफॉर्मेशनचे सीनियर व्हाइस प्रेसिडेंट डॉ. महेंद्र रामदासी, पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे, कुलसचिव डॉ. अनिल महेश्वरी आणि स्कूल ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन्सचे प्रमुख डॉ. कमलेश मेश्राम आदी उपस्थित होते.

कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी पीसीईटीच्या ३५ वर्षांहून अधिक शैक्षणिक परंपरेबद्दल सांगितले. उद्योगभिमुख अभ्यासक्रम, जपानी व कोरियन उद्योगांसोबतचे सहकार्य, जागतिक संधी आणि कौशल्याधारित शिक्षणाचा लाभ घेत विद्यार्थ्यांनी स्वतःला सक्षम बनावे असे सांगितले. डॉ. कमलेश मेश्राम यांनी विद्यार्थ्यांना हॅकेथॉन, उद्योग मान्य प्रमाणपत्र अभ्यासक्रम, क्लाउड कॉम्प्युटिंग, डेटा सायन्स आणि नव तंत्रज्ञान, नवकल्पना स्वीकारून प्रत्येक संधीचा लाभ घेत यशस्वी करिअर घडवा असे सांगितले.

डॉ. महेंद्र रामदासी यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी व्यावसायिक आयुष्यातील वेग आणि बदल स्वीकारावा. तांत्रिक कौशल्यांसोबतच सातत्याने शिकणे, पुन्हा शिकणे आणि आवश्यकतेनुसार जुन्या पद्धती विसरून नव्या पद्धती स्वीकारणे ही यशस्वी व्यावसायिकाची खरी ओळख आहे. बदल हा व्यावसायिक जीवनाचा अविभाज्य भाग असल्याने प्रत्येक विद्यार्थ्याने त्यासाठी सदैव तयार राहावे, असेही त्यांनी सांगितले.

विजेंद्र यादव यांनी सायबर सुरक्षा, डिजिटल पायाभूत सुविधा आणि भारतासाठी स्वदेशी सायबर सुरक्षा उपाय विकसित करण्याच्या गरजा यावर मार्गदर्शन दिले. तसेच मजबूत प्रोग्रामिंग कौशल्ये, मूलभूत संकल्पनांवरील प्रभुत्व आणि समस्यांकडे जिज्ञासूपणे पाहण्याची वृत्ती विद्यार्थ्यांनी विकसित केली पाहिजे.

## गणेशोत्सवात महाप्रसादावर एफडीएची करडी नजर

■ पिंपरी(दै. संध्या)

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना सुरक्षित व दर्जेदार खाद्यपदार्थ उपलब्ध व्हावेत यासाठी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) पुणे व पिंपरी-चिंचवड शहरात विशेष तपासणी मोहीम हाती घेतली आहे. या मोहिमेअंतर्गत मिठाईची दुकाने, खाद्यपदार्थ विक्री केंद्रे तसेच गर्दीच्या ठिकाणांवरील आस्थापनांची कसून तपासणी करण्यात येत असून आतापर्यंत सुमारे १५० आस्थापनांची पाहणी करण्यात आली आहे.

तपासणीदरम्यान अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन आढळून आलेल्या काही दुकानदारांना सुधारणा नोटीस बजावण्यात आल्या आहेत. स्वच्छता, खाद्यपदार्थांची गुणवत्ता, परवाने व अन्न सुरक्षा मानकांचे पालन याबाबत प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. यंदा एफडीएने गणेश मंडळांकडून भाविकांना वितरित करण्यात येणाऱ्या महाप्रसादावरही विशेष नजर ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

महाप्रसाद तयार करण्याची किंवा पुरवठ्याची ऑर्डर स्वीकारण्यापूर्वी परवानाधारक केटरर्सनी एफडीएचा अधिकृत पूर्वनियोजन नमुना भरून संबंधित झोनच्या अन्न सुरक्षा अधिकाऱ्यांकडे सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय दूध, पनीर, खवा, तूप आदी दुग्धजन्य पदार्थांच्या गुणवत्तेची तपासणीही सुरू असून भेसळ किंवा निकृष्ट दर्जाच्या पदार्थांवर कठोर कारवाईचा इशारा देण्यात आला आहे.

# थेरगाव हॉस्पिटलमध्ये इस्कॉनतर्फे सात्विक भोजन उपक्रम सुरू

■ पिंपरी (दै. संध्या)

थेरगाव येथील रुग्णालयात उपचार घेत असलेले रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी इस्कॉन संस्थेमार्फत सुरू करण्यात आलेल्या सात्विक भोजनाच्या (प्रसाद) उपक्रमाचा शुभारंभ पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला. आजारपण आणि संकटाच्या काळात रुग्णाला वैद्यकीय उपचारांसोबतच वेळेवर मिळणाऱ्या पौष्टिक आणि सात्विक आहाराची अत्यंत आवश्यकता असते, असे प्रतिपादन अभिषेक बारणे यांनी यावेळी केले.



हा उपक्रम अधिक प्रभावीपणे आणि सातत्याने राबवण्यासाठी 'सीएसआर' फंडाचा उत्तम वापर करण्यात आला असून, या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत शहरातील आरोग्यसेवेला मोठा हातभार लागणार आहे. या निधीच्या योग्य नियोजनामुळे रुग्णालयातील रुग्णांच्या प्रकृतीची विशेष काळजी घेऊन, पूर्णपणे स्वच्छता व नियमांचे पालन करत हलका, ताजा आणि घरगुती पद्धतीचा सात्विक आहार उपलब्ध होणार आहे. तसेच, दूरवरून उपचारासाठी आलेल्या आणि आर्थिक अडचणीत असलेल्या रुग्णांच्या कुटुंबीयांना बाहेर जेवणासाठी वणवण फिरावे लागू नये, यासाठी हा उपक्रम अतिशय मोलाचा आधार ठरणार आहे. भगवंताचा हा पवित्र प्रसाद रुग्णांना मानसिक स्थैर्य आणि लवकर बरे होण्यासाठी आवश्यक असलेली सकारात्मक ऊर्जा प्रदान करेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

शहराच्या सर्वांगीण विकासासोबतच नागरिकांचे आरोग्य आणि सामाजिक स्वास्थ्य जपण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहेच, परंतु जेव्हा सीएसआर फंडाच्या माध्यमातून अशा लोककल्याणकारी उपक्रमांमध्ये धार्मिक व सामाजिक संस्था पुढे येतात, तेव्हा समाजसेवेचे काम अधिक व्यापक होते, असे सांगत स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी इस्कॉन संस्था, सीएसआर अंतर्गत सहकार्य करणाऱ्यांचे आणि निस्स्वार्थ भावनेने सेवा देणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले. "थेरगाव हॉस्पिटलमधील रुग्णांसाठी आणि त्यांच्यासोबत असणाऱ्या नातेवाईकांसाठी इस्कॉन संस्थेने सीएसआर फंडाच्या माध्यमातून सुरू केलेल्या सात्विक भोजनाच्या (प्रसाद) उपक्रमाचा शुभारंभ करताना मला आनंद आहे. आजारपणाच्या कठीण काळात जेव्हा रुग्णाला घरगुती आणि पौष्टिक आहाराची गरज असते, तेव्हा हा उपक्रम त्यांना मोठा मानसिक आणि शारीरिक आधार देणारा आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### महापौर निवासस्थानी मान्यवरांकडून श्री गणरायाचे दर्शन

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती

**पुणे : दैनिक संध्या**

गणेशोत्सवाच्या मंगलमय वातावरणात पुण्याच्या महापौर सौ. मंजुषा नागपुरे यांच्या महापौर निवासस्थानी विराजमान झालेल्या श्री गणरायाचे आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दर्शन घेतले. यावेळी भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन, महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण तसेच राष्ट्रीय सह-संगठन महामंत्री शिवप्रकाश यांनीही श्री गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले. महापौर मंजुषा नागपुरे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. श्री गणरायाच्या चरणी महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासह पुणे शहराच्या प्रगतीसाठी, नागरिकांच्या सुख-समृद्धीसाठी आणि सर्वांच्या आरोग्य व मंगलमय भविष्यासाठी प्रार्थना करण्यात आली. गणरायाच्या दर्शनाने महापौर निवासस्थानी भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

### वसंतदादा पतसंस्थेची दमदार आर्थिक कामगिरी

**नारायणगाव : दैनिक संध्या**

जुन्नर तालुक्यातील अग्रगण्य वित्तीय संस्था असलेल्या वसंतदादा पाटील नागरी सहकारी पतसंस्थेने आर्थिक वर्षात उल्लेखनीय कामगिरी केली आहे. संस्थेला या वर्षात २ कोटी २२ हजार रुपयांचा निव्वळ नफा झाला असल्याची माहिती पतसंस्थेचे अध्यक्ष दीपक खैरे यांनी दिली. संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत या यशाची घोषणा करण्यात आली असून, सभासदांसाठी १२ टक्के लाभांश आणि दिवाळी भेटवस्तू देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला आहे.पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्ष दीपक खैरे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या प्रसंगी संस्थेचे संस्थापक दिवंगत अशोक अप्पा खैरे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ सामाजिक क्षेत्रातील योगदानाबद्दल जागतिक सर्पदंश तज्ज्ञ डॉ. सदानंद राऊत व डॉ. लहू खैरे यांना 'स्व. अशोक अप्पा खैरे जीवन गौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच महसूल, वित्त व वन विभागात निवड झाल्याबद्दल ऋतुजा गुंजाळ यांचाही विशेष सत्कार करण्यात आला. संस्थेचे मार्गदर्शक संतोष खैरे यांनी पतसंस्थेच्या सर्व शाखांसाठी स्वमालकीच्या इमारती उभारण्याच्या दृष्टीने नियोजन करण्याची सूचना केली. सभासदांचा संस्थेवरील विश्वास कायम ठेवत एकोप्याने काम करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

### जाहिर नोटीस

आमचे अशिल श्री. जावेद उस्मान इनामदार रा. वडगाव कांदळी ता. जुन्नर जि. पुणे येथील रहिवाशी असून त्यांची गाव मौजे वडगाव कांदळी येथे सौ. शमा शाबुद्दिन इनामदार यांचे गट नं – ११५१ च्या लगत पश्चिम बाजूने गट नं ११५२ हि जमीन मिळकत आहे. सदर गट नं ११५१ च्या जमीन मालकाने सदरची जमीन मिळकत विक्री करण्याचे ठरवले आहे. सदर गट नं ११५१ विक्री करत असलेबाबतची माहिती आमचे अशिल यांना झाली असता साक्षीदारांच्या समक्ष आमचे अशिल यांनी सदर जमीन मिळकत गट नं ११५१ हि विक्री करत असलेल्या किमतीत खरेदी घेणार असलेबाबतची तय्यारी दर्शवली आहे. तसेच मुस्लीम कायद्यातील आग्रहक्काच्या तरतुदी प्रमाणे सदर गट नं ११५१ हि आमचे अशिल यांच्या ११५२ च्या लगत पूर्व बाजूस असल्यामुळे तसेच जाणे-येण्याचा रस्ता व विहिरीतील हिस्सा देखील सामाईकात असल्यामुळे सदर मिळकत गट नं ११५१ हि आमचे अशिल यांना आग्रहक्काने खरेदी घेण्याचा अधिकार आहे. सबब सदर मिळकतीबाबत कुणीही खरेदी व्यवहार करू नये. या कामी हि जाहीर नोटीस देण्यात येत आहे

तरी या जाहीर नोटीसी द्वारे दवंडी देण्यात येते कि, वर नमूद केले प्रमाणे श्री. शमा शाबुद्दिन इनामदार यांच्या बरोबर वर नमूद मिळकत गट नं ११५१ बाबत कुणीही बेकायदेशीर रित्या कोणत्याही प्रकारचा हस्तांतरणाचा व्यवहार करू नये. यदाकदाचित कुणीही अशा प्रकारचा बेकायदेशीर हस्तांतरणाचा व्यवहार केल्यास सदरचा व्यवहार आमचे अशिल यांच्यावर बंधनकारक नसेल. या उलट तसे न वागल्यास आपणाविरुद्ध देखील आमचे अशिल यांना योग्य ती कायदेशीर कारवाई करणे भाग होईल मग होणाऱ्या खर्चास व परिणामास आपण सर्वस्वी जबाबदार असाल याची नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे नोटीस.
दि. १६/०९/२०२६

अॅड. मोहम्मद अब्बास सय्यद
ऑफिस :- नेहरू बाजार जुन्नर
ता. जुन्नर जि. पुणे ४१०५०२
मो. ८१६९१७६८१८

# बारामतीत PSEA BRCचा इंजिनिअर्स डे उत्साहात

**११० हून अधिक अभियंत्यांचा सहभाग**



■ **बारामती (दै. संध्या)**

भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या यांच्या जयंतीनिमित्त 'प्रोफेशनल स्ट्रक्चरल इंजिनिअर्स असोसिएशन - बारामती रिजन सेंटर' (PSEA BRC) आणि 'अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड' यांच्या संयुक्त विद्यमाने बारामती येथील हॉटेल कृष्णासागर येथे इंजिनिअर्स डे सोहळा व तांत्रिक चर्चासत्र उत्साहात पार पडले. या कार्यक्रमास बारामती,इंदापूर, पुरंदर,दौंड,फलटण,श्रीगोंदा आणि कर्जत-जामखेड या सात तालुक्यांमधील ११० हून अधिक स्ट्रक्चरल इंजिनिअर्स,सिव्हिल इंजिनिअर्स,वास्तुविशारद,बांधकाम व्यावसायिक,कंत्राटदार आणि तांत्रिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री बारामतीचे भाग्यविधाते स्व. अजितदादा पवार यांना भावपूर्ण आदरांजली अर्पण करून करण्यात आली.यानंतर इंजि.विकास निर्मळ लिखित व संकल्पित 'बारामतीचा विठ्ठल' हा विशेष श्राव्य-दृश्य माहितीपट प्रदर्शित करण्यात आला.महाराष्ट्राच्या व बारामतीच्या विकासप्रवासातील विविध पैलू आणि पायाभूत सुविधांच्या उभारणीशी संबंधित आठवणी मांडणाऱ्या या सादरीकरणानंतर उपस्थितांची मन दादांच्या आठवणींनी हेलावली. या प्रसंगी PSEA चे राष्ट्रीय अध्यक्ष इंजि.शेषराव कदम आणि राष्ट्रीय सचिव इंजि.अजय कदम यांनी उपस्थित अभियंत्यांना इंजिनिअर्स डेच्या शुभेच्छा देत अभियंत्यांची सामाजिक व व्यावसायिक जबाबदारी,स्ट्रक्चरल सेफ्टी, बांधकामातील गुणवत्ता, व्यावसायिक शिस्त आणि तांत्रिक ज्ञानाचे सातत्याने अद्ययावतीकरण याबाबत मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनानंतर उपस्थित अभियंते आणि तज्ज्ञांमध्ये स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगच्या विविध विषयांवर उत्स्फूर्त संवाद झाला.

कार्यक्रमातील प्रमुख तांत्रिक सत्रात डॉ. समाधान जी.मोरखडे, असोसिएट प्रोफेसर, VPKBIET, बारामती यांनी 'Earthquake Analysis and Design of Structures' या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. भूकंपप्रवण परिस्थितीत इमारतींचे विश्लेषण व डिझाईन, स्ट्रक्चरल बिहेवियर,डक्टाइल डिटेलिंग, RCC स्ट्रक्चर्समधील आवश्यक काळजी तसेच संबंधित भारतीय मानकांनुसार डिझाईन व बांधकाम करताना घ्यावयाच्या तांत्रिक बाबींवर त्यांनी माहिती दिली. सादरीकरणानंतर उपस्थित अभियंत्यांनी प्रत्यक्ष डिझाईन व साइटवरील अडचणींशी संबंधित विविध प्रश्न उपस्थित केले. त्यानंतर झालेल्या तांत्रिक चर्चेत IS Codes, RCC डिझाईन, भूकंपरोधक बांधकाम, डक्टाइल डिटेलिंग,काँक्रीट गुणवत्ता,साइट एक्झिक्युशन आणि स्ट्रक्चरल सेफ्टी यांसारख्या विषयांवर सविस्तर विचारविनिमय झाला. प्रत्यक्ष बांधकाम क्षेत्रातील अनुभव आणि तांत्रिक ज्ञानाची देवाणघेवाण झाल्याने हे चर्चासत्र उपस्थित अभियंत्यांसाठी उपयुक्त ठरले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा.इंजि. सचिन सातव नगराध्यक्ष,बारामती नगरपरिषद यांनी उपस्थितांना संबोधित करताना बारामती शहराच्या नियोजनबद्ध आणि सुरक्षित विकासासाठी तांत्रिक क्षेत्रातील व्यावसायिकांची भूमिका महत्त्वाची असल्याचे नमूद केले.नगरपालिका,स्ट्रक्चरल इंजिनिअर्स,वास्तुविशारद, डेव्हलपर्स आणि बांधकाम क्षेत्रातील घटक यांनी समन्वयाने काम करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.शहराच्या विकासकामांसाठी तांत्रिक क्षेत्रातील तज्ज्ञांचे सहकार्य आणि संवाद वाढविण्याच्या दृष्टीने 'Line of Action' बाबतही त्यांनी आपले विचार मांडले.

या कार्यक्रमास नगरसेवक इंजि. अमोल कावळे तसेच Builders Association of India (BAI) आणि CREDAI Baramati Center यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

> PSEA BRC च्या वतीने आयोजित या इंजिनिअर्स डे सोहळ्यामुळे अभियंत्यांना एकत्र येऊन तांत्रिक ज्ञानाची देवाणघेवाण करण्याबरोबरच स्ट्रक्चरल सेफ्टी, गुणवत्तापूर्ण बांधकाम आणि व्यावसायिक जबाबदारी यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर संवाद साधण्यासाठी प्रभावी व्यासपीठ उपलब्ध झाले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी PSEA BRCच्या सर्व पदाधिकारी,कार्यकारिणी सदस्य,सहकारी अभियंते आणि अल्ट्राटेक सिमेंट लिमिटेड यांचे विशेष सहकार्य लाभले.

PSEA BRC च्या माध्यमातून बारामतीसह कार्यक्षेत्रातील सातही तालुक्यांमधील स्ट्रक्चरल इंजिनिअर्सना एकत्र आणून तांत्रिक ज्ञान,व्यावसायिक समन्वय आणि बांधकाम क्षेत्रातील सुरक्षितता व गुणवत्तेबाबत जनजागृती वाढविण्याचा प्रयत्न करण्यात येत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत PSEA BRCचे अध्यक्ष इंजि. दिलीप यादव यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि संपूर्ण सत्राचे संयोजन सल्लागार इंजि.विकास निर्मळ यांनी अभ्यासपूर्ण व ओघवत्या शैलीत केले. उपस्थितांचे आणि कार्यक्रमासाठी सहकार्य करणाऱ्या सर्व संस्था व मान्यवरांचे आभार सचिव इंजि.सूरज चांदगुडे यांनी मानले. कार्यक्रमाच्या नियोजन व व्यवस्थापनाची जबाबदारी खजिनदार इंजि.गौरव जाधव तसेच PSEA BRCच्या कार्यकारिणी सदस्यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

## साबळे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

■ **सासवड (दै. संध्या)**




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सहकार्याने पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या शेठ गोविंद रघुनाथ साबळे कॉलेज ऑफ फार्मसी, सासवड येथे आविष्कार स्पर्धा २०२६ चे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या स्पर्धेमध्ये बी. फार्मसी विभागातील ३८ पोस्टर्स, एम. फार्मसी विभागातील १० पोस्टर्स तसेच डिप्लोमा विभागातील १३ पोस्टर्स, असे एकूण ६१ संशोधनपर पोस्टर्स विद्यार्थ्यांनी सादर केले. विद्यार्थ्यांनी विविध नाविन्यपूर्ण संशोधन संकल्पना, वैज्ञानिक दृष्टिकोन तसेच समाजोपयोगी संशोधनाच्या कल्पना प्रभावीपणे मांडल्या. कार्यक्रमाचे स्वागत प्रा. सृष्टी जाधव यांनी केले. संशोधन समन्वयक डॉ. स्मिता पवार यांनी प्रास्ताविकातून आविष्कार स्पर्धेचे उद्दिष्ट व विद्यार्थ्यांसाठी असलेले महत्त्व स्पष्ट केले. विद्यार्थ्यांना आविष्कार पोस्टर सादरीकरणाबाबत मार्गदर्शन करताना संशोधनातील नाविन्यता, विषयाची मांडणी, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि प्रभावी सादरीकरण कौशल्य याविषयी महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. राजश्री चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना संशोधनामध्ये नाविन्यता, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि समाजोपयोगी संशोधन यांचे महत्त्व अधोरेखित केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डॉ. नितीन घोरपडे, प्राचार्य, पीडीईएचे वाघिरे कॉलेज, सासवड तसेच सदस्य, मॅनेजमेंट कौन्सिल, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पोस्टर परीक्षणासाठी डॉ. मीरा सी. सिंग, प्रोफेसर, सिंहगड कॉलेज ऑफ फार्मसी, वडगाव (बु.), पुणे तसेच प्रोफेसर विशाखा गनवीर, वाघिरे कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स, सासवड यांनी परीक्षक म्हणून जबाबदारी पार पाडली.

## जेजुरीच्या कडेपठारावर खंडोबा देवाला पहाटे सूर्यकिरणांचा अभिषेक



■ **जेजुरी (दै. संध्या)**

सप्टेंबर व मार्च महिन्यात सूर्याची किरणे लंबरूप पडतात. भारतातील मंदिरे पूर्वमुखी असल्याने ही सूर्यकिरणे थेट मंदिरात प्रवेश करतात. बुधवार दिनांक 26 रोजी पहाटे सहा वाजून 25 मिनिटांनी सूर्यकिरणांनी महाराष्ट्राचे कुलदैवत असणाऱ्या कडेपठारावरील कडेपठार खंडोबा मंदिरातील स्वयंभू शिवलिंगावर प्रवेश केला. सोनेरी सूर्यकिरणांनी या स्वयंभू लिंगावर अभिषेक घातला. सूर्यस्नाना नंतर मंदिरातील पुजारी सेवक वर्ग, नित्य सेवकवर्ग यांनी देवाची आरती करून भंडारा उधळून येळकोट येळकोट चा जयघोष केला.

# पुणे आदर्श शाळा : ग्रामीण शिक्षणात क्रांतीची नवी पहाट

■ **नाझरे सुपे, ता. पुरंदर (दै. संध्या)**

ग्रामीण भागातील मुलांनाही जागतिक दर्जाचे शिक्षण मिळावे, या उदात्त हेतूने पुणे जिल्हा परिषदेने हाती घेतलेला पुणे आदर्श शाळा हा नावीन्यपूर्ण उपक्रम पुरंदर तालुक्यात क्रांतिकारी ठरत आहे. सक्षम शिक्षण व्यवस्था काय करू शकते याचा आदर्श या शाळांनी घालून दिला आहे. या उपक्रमांतर्गत तालुक्यातील तीन शाळांचा कायापालट झाला आहे.

जगताप वस्ती येथील जिल्हा परिषद शाळा हे या यशाचे उत्तम उदाहरण आहे. आकर्षक रंगरंगोटी केलेल्या वर्गखोल्या, अत्याधुनिक आभासी फलक, सुरक्षेसाठी



विहंगम नजरेसाठी लावलेली यंत्रणा, भरपूर नैसर्गिक प्रकाश असणाऱ्या खोल्या आणि भव्य क्रीडांगण यामुळे ही शाळा केवळ शाळा न राहता मुलांच्या आवडीचे ठिकाण बनली आहे. या शाळेचे सर्वात मोठे यश म्हणजे आतापर्यंत शिक्षणाच्या प्रवाहापासून दूर असलेल्या भटक्या समाजातील मुले आता मोठ्या कुतूहलाने आणि जिद्दीने येथे शिकत आहेत. शाळेत येणारी ही त्यांच्या कुटुंबातील पहिलीच पिढी असून या शाळेने त्यांच्या जीवनाला नवी दिशा दिली आहे.

> पिंपरी खुर्द येथील शाळेने तर कौशल्यावर आधारित शिक्षणाचा नवा पायंडा पाडला आहे. येथे सातशेहून अधिक मुले शिक्षण घेत असून त्यांना पुस्तकी ज्ञानासोबतच प्रत्यक्ष अनुभवातून कौशल्य वाढीचे शिक्षण दिले जात आहे. आभासी फलक, यंत्रमानव प्रयोगशाळा, आधुनिक उद्योग तंत्रज्ञानावर आधारित शिक्षणामुळे मुले भविष्यातील आव्हानांसाठी सज्ज होत आहेत. शारीरिक सुदृढतेसाठी विस्तीर्ण क्रीडांगण आणि निसर्गरम्य स्वच्छ परिसर येथे उपलब्ध आहे. एकंदरीत शिक्षण आणि कौशल्य यांचा सुरेख संगम साधणारी ही आदर्श शाळा ग्रामीण शिक्षणासाठी नवा आदर्श निर्माण करत आहे.

नारायणपूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेने पारंपरिक शिक्षणाला आधुनिकतेची जोड देत ग्रामीण शिक्षणाची नवी दिशा दाखवली आहे. जग ज्या वेगाने बदलत आहे त्याच वेगाने ग्रामीण शिक्षणातही बदल घडवण्याचा निर्धार परिषदेने केला आहे. मुलांना स्पर्धेच्या युगात आत्मविश्वासाने उभे करण्यासाठी विशेष प्रयत्न येथे केले जात आहेत. शासनाच्या या प्रयत्नांमुळे ग्रामीण भागातील मुले मुख्य प्रवाहात येत असून त्यांच्यात टिकून राहण्याची क्षमता निर्माण होत आहे.

# 'स्क्रिप्टशिवाय मी आज तुमच्यासमोर उभा आहे' – मयूर गायके

**पुरुषोत्तम करंडक विजेत्या संघाचे वाघिरे महाविद्यालयात अनुभवकथन**

■ **सासवड (दै. संध्या)**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या वाघिरे महाविद्यालयात सांस्कृतिक विभागाच्या उद्घाटनानिमित्त पुरुषोत्तम करंडक २०२६ स्पर्धेतील विजेत्या संघाच्या अनुभवकथन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या कार्यक्रमात पुरुषोत्तम करंडक २०२६ (पुणे विभाग) व हरी विनायक करंडक स्पर्धेत 'आठवडे बाजार' ही एकांकिका सादर करून सांघिक द्वितीय पारितोषिक मिळविणाऱ्या संघातील विद्यार्थ्यांनी आपल्या कलाप्रवासातील अनुभव उपस्थितांसमोर मांडले. महाविद्यालयाच्या सांस्कृतिक विभागामार्फत विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे, तसेच विविध सांस्कृतिक उपक्रमांमध्ये त्यांचा सहभाग वाढावा, या उद्देशाने विविध उपक्रम राबविले जातात. याच पार्श्वभूमीवर पुरुषोत्तम करंडकासारख्या प्रतिष्ठेच्या एकांकिका स्पर्धेतील विद्यार्थ्यांचा अनुभव नवोदित कलाकारांपर्यंत पोहोचविण्यासाठी या अनुभवकथनाचे आयोजन करण्यात आले. यावेळी आस्था काळे, मयूर गायके, दिपाली धुमाळ, आयुश्री मिश्रा आणि संस्कार फडके यांनी 'आठवडे बाजार'च्या तालमीपासून अंतिम सादरीकरणापर्यंतचा प्रवास उलगडला. भूमिकेची तयारी, व्यक्तिरेखा समजून घेणे, संवादफेक, दिग्दर्शन, समूहातील समन्वय, तालमीसाठी दिलेला वेळ आणि स्पर्धेच्या वातावरणातील आव्हाने याबाबत त्यांनी आपले अनुभव सांगितले. 'स्क्रिप्टशिवाय मी आज तुमच्यासमोर उभा आहे,' असे सांगताना मयूर गायके यांनी रंगभूमीच्या अनुभवातून आत्मविश्वास आणि व्यक्त होण्याची क्षमता विकसित झाल्याचे नमूद केले. तालमीदरम्यान झालेल्या चुका, त्यातून घेतलेले धडे, सहकलाकारांचे सहकार्य आणि सातत्यपूर्ण सराव यामुळे सादरीकरण अधिक प्रभावी होत गेले, असे विद्यार्थ्यांनी सांगितले.



पुरुषोत्तम करंडकातील यशामागे केवळ रंगमंचावरील सादरीकरण नसून सातत्यपूर्ण मेहनत, शिस्त, संघभावना, वेळेचे नियोजन आणि कलाकृतीविषयीची बांधिलकी महत्त्वाची ठरल्याचे विद्यार्थ्यांनी स्पष्ट केले. तालमीदरम्यान येणाऱ्या अडचणींवर एकजुटीने मात करत अंतिम सादरीकरणापर्यंतचा प्रवास कसा घडला, याचे अनुभव त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांशी शेअर केले. यावेळी प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांनी विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे कौतुक केले. महाविद्यालयीन जीवनात शिक्षणाबरोबरच कला, संस्कृती, नाट्य आणि विविध सर्जनशील उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. रंगभूमीमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, संघभावना, संवादकौशल्य, सर्जनशीलता आणि नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले. पुरुषोत्तम करंडकातील यशामुळे महाविद्यालयाच्या सांस्कृतिक कार्याला नवी ऊर्जा मिळाली असून विद्यार्थ्यांना भविष्यातही आवश्यक संधी व प्रोत्साहन दिले जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, रामकृष्ण मोरे प्रतिष्ठानच्या वतीने सौ. मीरा चिकणे यांनी एकांकिका स्पर्धेतील विजेत्या संघाला पाच हजार रुपयांचे रोख पारितोषिक देऊन सन्मानित केले.


कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. किरण गाढवे यांनी केले. त्यांनी सांस्कृतिक विभागाची भूमिका आणि विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे महत्त्व स्पष्ट केले. यावेळी प्रा. अभिलाष जगताप, उपप्राचार्य डॉ. संजय झगडे, वाणिज्य विभागाचे समन्वयक डॉ. नरसिंग गिरी यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी आणि सांस्कृतिक विभागाशी संबंधित विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. पूर्वाराणी जगताप यांनी आभार मानले, तर डॉ. सुवर्णा खोडदे यांनी सूत्रसंचालन केले. विजेत्या संघाच्या अनुभवकथनामुळे विद्यार्थ्यांना रंगभूमीवरील प्रत्यक्ष अनुभव जाणून घेण्याची संधी मिळाली.

तसेच महाविद्यालयातील नवोदित कलाकारांना सांस्कृतिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरणा मिळाली.

यासाठी अधिक ठळक वर्तमानपत्रीय हेडलाईन हवी असल्यास, उदा. "रंगभूमीने दिला आत्मविश्वास; 'स्क्रिप्टशिवाय' मयूरने सांगितला यशाचा प्रवास" अशा धाटणीच्या पर्यायांतही बातमी मांडता येईल.




दैनिक संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक



# सिंधुदुर्ग विकासाच्या नव्या वळणावर....

*सिंधुदुर्गच्या निसर्गसौंदर्याचे संवर्धन करत आर्थिक समृद्धी साधण्याच्या उद्देशाने पुढील २५ ते ३० वर्षांचा भविष्यवेधी विकास आराखडा पालकमंत्री नितेश राणे यांच्या संकल्पनेतून साकारला जात आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरणपूरक प्रकल्पांना चालना देतानाच व्हीव्हीआयपी पर्यटकांना आकर्षित करणारी 'ताज'सारखी पंचतारांकित हॉटेल्स आणि नवीन पर्यटनस्थळे विकसित केली जात आहेत. राज्यातील पहिला पर्यटन जिल्हा म्हणून ओळख असलेल्या सिंधुदुर्गाला आता पर्यटनाच्या दृष्टीने अधिक विकसित आणि सक्षम करण्याच्या दिशेने नियोजनबद्ध प्रयत्न सुरू आहेत. विकासाच्या नव्या वळणावरील सिंधुदुर्गच्या प्रगतीचा हा आढावा....*

जहाजबांधणी उद्योगाच्या माध्यमातून स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याबरोबरच जलवाहतूक, चिपी विमानतळ आणि दर्जेदार रस्त्यांच्या जाळ्याद्वारे दळणवळणाचा विस्तार केला जात आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून वातावरणातील बदलांपासून हापूस आंबा, काजू आणि कोकम पिकांचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजना सुरू आहेत. जहाजबांधणीसारखे पर्यावरणपूरक उद्योग सिंधुदुर्गात आणण्यासोबतच आधुनिक मत्स्यव्यवसाय, स्थानिक कला व संस्कृतीच्या विकासासाठी कलाकारांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. स्थानिक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनांसाठी बाजारपेठ उपलब्ध करून देण्यावरही भर आहे. सक्षम आरोग्य सुविधा, कौशल्य विकास, शून्य कचरा व सांडपाणी व्यवस्थापन, पूर व दरड प्रतिबंधक उपाययोजना तसेच प्रशासनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर यांना प्राधान्य देण्यात येत आहे. पर्यावरणाचा समतोल, पर्यटन, शेती-मत्स्यव्यवसाय, रोजगार आणि गतिमान पायाभूत सुविधा या पंचसूत्रीच्या माध्यमातून सिंधुदुर्गला शाश्वत आर्थिक विकासाच्या दिशेने नेण्याचा सुरू आहे.

निसर्गाचे मुक्त वरदान लाभलेला, अथांग अरबी समुद्रकिनारा आणि हिरवागार सह्याद्री यांची समृद्ध देणगी लाभलेला सिंधुदुर्ग जिल्हा आज शाश्वत प्रगतीच्या एका ऐतिहासिक वळणावर उभा आहे. निसर्गसौंदर्य जपत असताना जिल्ह्याला आर्थिक सुबत्तेकडे कसे नेता येईल, हा प्रश्न कोकणाच्या संदर्भात नेहमीच कळीचा राहिला आहे. पर्यावरण संवर्धन आणि आर्थिक उन्नती या दोन्ही गोष्टींचा समांतर समतोल साधत जिल्हा प्रशासन अत्यंत नियोजनबद्धरीतीने या ध्येयाकडे वाटचाल करत आहे. उद्देश एकच पर्यावरणपूरक विकास आणि रिव्हर्स मायग्रेशन.


विकास आराखडा तयार करताना पर्यावरण आणि प्रगती हे एकमेकांशी विसंगत नसून परस्परपूरक आहेत, हे तत्त्व केंद्रस्थानी ठेवण्यात आले आहे. मालदीवसारख्या आंतरराष्ट्रीय पर्यटन क्षेत्राचे उदाहरण घेतल्यास, तिथे समुद्रात भव्य वॉटर व्हिला उभारूनही तिथल्या सागरी परिसंस्थेला धक्का पोहोचू दिला गेला नाही. योग्य मार्ग आणि नियोजनबद्ध उपाययोजनांमुळे हे शक्य झाले. त्याच धर्तीवर सिंधुदुर्गातही निसर्गाचे मूळ सौंदर्य अबाधित ठेवून विकासकामे पुढे नेली जात आहेत. केवळ पारंपरिक पद्धतींवर अवलंबून न राहता प्रशासकीय पातळीवर पर्यावरणपूरक, प्रयोगशील आणि धाडसी धोरणात्मक निर्णय घेण्यावर भर दिला जात आहे.

जिल्ह्याची अर्थव्यवस्था बळकट करण्यासाठी दरडोई उत्पन्नातील तफावत भरून काढणे अनिवार्य आहे. शेजारील गोव्याचे दरडोई उत्पन्न सुमारे साडेचार ते पाच लाख रुपयांच्या घरात पोहोचले असताना सिंधुदुर्ग अजूनही दोन ते सव्वादोन लाखांच्या आसपास आहे. हे अंतर कमी करण्यासाठी केवळ बजेट पर्यटनावर मर्यादित न राहता उच्च खर्च क्षमता असणाऱ्या पर्यटकांना आकर्षित करण्याचे धोरण आखण्यात आले आहे.

यासाठी जिल्ह्यात 'ताज','हयात' सारख्या जागतिक ख्यातीच्या पंचतारांकित हॉटेल ब्रँड्सचे जाळे विणले जात आहे. सोबतच 'डिझनीलँड' व 'युनिव्हर्सल स्टुडिओ' सारख्या भव्य मनोरंजन प्रकल्पांच्या संकल्पनांवर काम सुरू आहे. पर्यटक जिल्ह्यात केवळ एक-दोन दिवस थांबून गोव्याकडे निघून जाऊ नयेत, तर त्यांनी येथे किमान तीन ते चार दिवस मुक्काम करावा, याद्दष्टीने सुमारे २५ नवीन पर्यटन स्पॉट्स विकसित करण्यात येत आहेत. यामुळे स्थानिक हॉटेल व्यावसायिक, टॅक्सी चालक, गाईड्स आणि गृहउद्योगांच्या उत्पन्नात मोठी वाढ होईल.

जिल्ह्यातील सर्वाधिक संवेदनशील आव्हान म्हणजे हुशार आणि उच्चशिक्षित मनुष्यबळाचे होणारे स्थलांतर. दहावी-बारावीत १०० टक्के निकाल देणारी स्थानिक गुणवत्ता केवळ रोजगाराच्या शोधात मुंबई, पुणे अथवा गोव्यात जाते. ही बौद्धिक संपत्ती जिल्ह्यातच स्थिरावली पाहिजे, यासाठी मोठ्या पर्यावरणपूरक उद्योगांना निमंत्रित केले जात आहे. आता रिव्हर्स मायग्रेशन जिल्ह्यात सुरु व्हायला सुरुवात झाली आहे.

गोव्यात नव्याने उभारण्यात आलेल्या उड्डाणपुलांच्या उंचीच्या मर्यादेमुळे तेथील ३० मीटर उंचीची जहाजे बांधणाऱ्या 'शिप बिल्डिंग इंडस्ट्री'ला जागेची व संचलनाची अडचण निर्माण झाली आहे. भारतातील एकूण जहाजांपैकी सुमारे ४० टक्के जहाजे गोव्यात तयार होतात. हा उद्योग थेट ६ ते ७ हजार आणि अप्रत्यक्षरीत्या १० हजारांहून अधिक रोजगार देणारा आहे. गोव्यातील या अडचणीचे




रूपांतर सिंधुदुर्गासाठी संधीत करण्यासाठी गोवा शिपयार्ड व गोवा शिपिंग असोसिएशनशी चर्चा सुरू आहे. या उद्योगाचा विस्तार जिल्ह्यात झाल्यास हजारो स्थानिक तरुणांना स्वतःच्याच मातीत दर्जेदार तांत्रिक व प्रशासकीय रोजगार उपलब्ध होईल.

पर्यटन आणि उद्योगांच्या विस्ताराला खरी गती देण्यासाठी आधुनिक, बहुआयामी दळणवळण यंत्रणा उभारण्यावर जिल्हा प्रशासनाने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. जलवाहतुकीच्या क्षेत्रात क्रांती घडवताना चिपी विमानतळाजवळील कर्ली ते तारकर्ली दरम्यान सागरी जलमार्ग सुरू करण्याचे नियोजन असून, सध्या रस्तेमार्गे १ तास २० मिनिटे लागणारे हे अंतर या जलमार्गामुळे अवघ्या ११ मिनिटांत पूर्ण होणार आहे. हवाई वाहतुकीला बळकटी देण्यासाठी चिपी विमानतळ २४ तास कार्यान्वित ठेवण्याचे प्रयत्न सुरू असून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरून थेट विमानफेऱ्या सुरू होत आहेत. रेल्वे प्रवाशांसाठी नव्या गाड्या आणि नियमित फेऱ्या वाढवण्यावर भर दिला जात आहे. शेजारील मोपा आंतरराष्ट्रीय विमानतळ जिल्ह्याच्या सीमेवर असल्याने सिंधुदुर्ग हे गोव्याचे नैसर्गिक विस्तार क्षेत्र ठरत असून, तिथे उतरणाऱ्या पर्यटकांना जिल्ह्यात वळवण्यासाठी सर्व पायाभूत सुविधा सज्ज ठेवल्या जात आहेत. यासोबतच जिल्ह्यातील दुर्गम भागांतही पर्यटक आणि नागरिकांना अखंड डिजिटल संपर्क मिळावा म्हणून बीएसएनएल आणि जिओच्या सहकार्याने दूरसंचार जाळे अधिक सक्षम केले जात आहे.

जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासात स्थानिक शेतकरी, बागायतदार आणि मच्छीमार केंद्रस्थानी आहेत. कोकणाचा राजा असलेला जगप्रसिद्ध हापूस आंबा, काजू आणि कोकम यांसारख्या स्थानिक फलोत्पादनांवर जिल्ह्यातच प्रक्रिया करणारे ॲग्रो-प्रोसेसिंग युनिट्स उभारण्यात येत आहेत, ज्यामुळे थेट शेतकऱ्यांच्या नफ्यात वाढ होईल.

सागरी अर्थव्यवस्थेला चालना देताना पारंपरिक मच्छीमारांचे हक्क अबाधित ठेवून आधुनिक शीतगृहे, मासळी प्रक्रिया आणि थेट निर्यातीसाठी कार्गो साखळी निर्माण केली जात आहे. सावंतवाडीची ऐतिहासिक लाकडी खेळणी, तांब्या-पितळेची कलाकुसर आणि मालवणी खाद्यसंस्कृतीला पंचतारांकित हॉटेल्सशी जोडून महिला बचत गटांना हक्काची बाजारपेठ मिळवून दिली जात आहे. सोबतच छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंधुदुर्ग, विजयदुर्ग, सारख्या सर्वच जलदुर्गांचे जतन आणि दशावतारासारख्या पारंपरिक लोककलांना पर्यटनाशी जोडून सांस्कृतिक वारसा जपला जात आहे.

शाश्वत प्रगतीसाठी नागरिकांचे जीवनमान सुरक्षित आणि समृद्ध असणे गरजेचे आहे. उपचारांसाठी शेजारील जिल्हा किंवा राज्यांवर अवलंबून राहावे लागू नये म्हणून शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि मल्टिस्पेशालिटी आरोग्य सुविधा जिल्ह्यात सक्षम केल्या जात आहेत. उद्योग व हॉस्पिटॅलिटी क्षेत्राच्या गरजेनुसार स्थानिक तरुणांसाठी कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्रे सुरू केली जात आहेत. वाढत्या पर्यटनामुळे निसर्गाची हानी होऊ नये म्हणून शून्य कचरा, आधुनिक सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा आणि सौरऊर्जेचा वापर अनिवार्य केला जात आहे.

पावसाळ्यातील अतिवृष्टी आणि पुराचा फटका बसू नये म्हणून नद्यांमधील गाळ उपसण्याचा पद्धतशीर कार्यक्रम हाती घेण्यात आला असून, यामुळे पुराची ६० ते ७० टक्के समस्या मार्गी लागत आहे. घाट रस्त्यांवर दरडी कोसळू नयेत म्हणून आधुनिक संरक्षक जाळ्या बसवून सुरक्षितता वाढवण्यात आली आहे. प्रशासनात कृत्रिम बुद्धिमत्तेचा सर्वाधिक वापर करून ई-प्रशासनाच्या माध्यमातून पारदर्शक आणि जलद निर्णयप्रक्रिया राबवणारा जिल्हा म्हणून सिंधुदुर्ग पथदर्शी ठरत आहे.

पर्यावरणाचा समतोल, उच्च दर्जाचे पर्यटन, स्थानिक शेती-मत्स्यव्यवसायाचे सक्षमीकरण, पर्यावरणपूरक रोजगार आणि गतिमान पायाभूत सुविधा या पंचसूत्रीवर सिंधुदुर्गाचा पुढील २५ वर्षांचा विकास आराखडा साकारला जात आहे. निसर्गाचे पावित्र्य जपत आर्थिक संपन्नतेकडे टाकलेले हे पाऊल सिंधुदुर्ग जिल्ह्याला विकासाच्या राष्ट्रीय नकाशावर अग्रस्थानी नेणारे नक्कीच ठरेल.

संकलन – जिल्हा माहिती कार्यालय, सिंधुदुर्ग

## थोडक्यात पण महत्वाचे

### सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेला 'प्रगती'चा बूस्टर

मुंबई : राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, गुणवत्तापूर्ण, तंत्रज्ञानाधारित आणि लोकाभिमुख करण्यासाठी 'प्रगती' (प्रगती हेल्थकेअर रिइमॅजिन्ड विथ ॲडव्हान्स्ड गव्हर्नन्स अँड ॲक्सेसीबल टेक्नॉलॉजी इंटिग्रेशन) या सर्वसमावेशक आरोग्य सुधारणा प्रकल्पाला राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या नेतृत्वाखाली तसेच सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर आणि राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रकल्प राबविण्यात येणार आहे. २०२६ ते २०३१ या पाच वर्षांच्या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या प्रकल्पाची सुधारित किंमत ४ हजार २५० कोटी रुपये आहे. यापैकी २ हजार ९७५ कोटी रुपये एशियन डेव्हलपमेंट बँकेच्या (एडीबी) कर्जातून, तर १ हजार २७५ कोटी रुपये राज्य शासनाच्या निधीतून उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. प्राथमिक ते तृतीयस्तरीय आरोग्यसेवेचे बळकटीकरण प्राथमिक, द्वितीय आणि तृतीयस्तरीय आरोग्य संस्थांना एकात्मिक पद्धतीने बळकटी देणे, असंसर्गजन्य आजारांचा प्रतिबंध, तपासणी, लवकर निदान व उपचार, अत्याधुनिक डिजिटल आरोग्य व्यवस्था, प्रभावी संदर्भ सेवा साखळी, आरोग्य संस्थांच्या पायाभूत सुविधांचा विकास आणि नागरिकांचा आरोग्यावरील स्वखर्च कमी करणे, ही या प्रकल्पाची प्रमुख उद्दिष्टे आहेत. प्राथमिक आरोग्य केंद्रे, आयुष्मान आरोग्य मंदिरे, शहरी आरोग्य केंद्रे तसेच द्वितीय आणि तृतीयस्तरीय आरोग्य संस्थांमध्ये आवश्यक उपकरणे, प्रशिक्षित मनुष्यबळ, औषधे व निदान साहित्य उपलब्ध करून देण्यात येणार आहे. प्राथमिक स्तरावर निदान झालेल्या रुग्णांना पुढील उपचारांसाठी योग्य वेळी उच्चस्तरीय रुग्णालयात पाठविणे आणि उपचारांनंतर संबंधित रुग्णाचा स्थानिक आरोग्य संस्थेशी समन्वय कायम ठेवण्यासाठी प्रभावी संदर्भ व प्रत्यावर्तन व्यवस्था विकसित केली जाणार आहे.

### बेसा – पिपळाच्या पाणीपुरवठ्यासाठी कायम स्वरूपी उपाययोजना करा

नागपूर : बेसा-पिपळा नगरपंचायत क्षेत्रातील पाणीपुरवठ्यातील अनियमितता टाळण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करून येथील नागरिकांना सुरळीत पाणीपुरवठा करण्याचे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले. बेसा-पिपळा नगरपंचायत पाणीपुरवठा योजनेचा आज सविस्तर आढावा त्यांनी घेतला, त्यावेळी ते बोलत होते. या बैठकीस बेसा – पिपळाच्या नगराध्यक्षा कीर्ती बडोले, उपाध्यक्ष नरेश भोयर यांच्यासह जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, उपविभागीय अधिकारी वंदना सौरंगपते, भूमि अभिलेखचे जिल्हा अधीक्षक श्री. मोहिते, मुख्याधिकारी भारत नंदनवार आदी उपस्थित होते. पालकमंत्री म्हणाले, जलशुद्धीकरण केंद्रातून दूषित पाणीपुरवठा होऊ नये यासाठी पाणी सोडताना सतर्कता बाळगावी, बांधकामासाठी लागणाऱ्या पाण्याच्या अनधिकृत जोडण्या शोधून त्या तात्काळ खंडित कराव्यात व जलस्रोतापासून पाणी वाहून आणताना त्यात होणारा पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी उपाययोजना करावी. या भागात महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत पाणीपुरवठा करण्यात येतो. परंतु, येथील काही भागात नियमित पाणीपुरवठा होत नसून योग्य नियोजनातूनच कायमस्वरूपी उपाययोजना करता येणे शक्य असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले. यासाठी जिल्हाधिकारी, महापालिका आयुक्त, एनएमआरडीए व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी समन्वयातून कार्यवाही करावी. नागरिकांना सुरक्षित, शुद्ध आणि पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने जलशुद्धीकरण केंद्रातील त्रुटी दूर करून मानकांनुसार नियमित शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यासह पाणीगळतीमुळे होणारा पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी तातडीने कृती आराखडा तयार करावा व त्याबाबतचा अहवाल मुदतीत सादर करण्याचे आदेश त्यांनी नगरपंचायत प्रशासनाला यावेळी दिले. प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मौजा पिपळा, घोगली, बेसा व बेलतरोडी येथील पट्टे वाटप तात्काळ पूर्ण करावे, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत नागरिकांसाठी पाणीपुरवठा, स्वच्छता, दिवाबत्ती, अशा मूलभूत सुविधांची निर्मिती करण्यात यावी.

# प्रस्तावित आंतरराष्ट्रीय कृषी बाजाराच्या उभारणीकरिता गतीने नियोजन करणार

■ मुंबई (दै. संध्या)

पालघर जिल्ह्यातील दापचरी येथे प्रस्तावित आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कृषी बाजाराच्या उभारणीला गती देण्यासाठी पणन मंत्री जयकुमार रावल यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक झाली. वाढवण बंदराच्या निकटतेचा लाभ घेऊन महाराष्ट्रातील शेतमालाला जागतिक बाजारपेठेत अधिक सक्षमपणे पोहोचविण्यासाठी दापचरी येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय कृषी बाजार प्रकल्प राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बाजारव्यवस्थेशी जोडण्यात येणार आहे. या प्रकल्पाच्या उभारणीसाठी गतीने नियोजन करण्याचे निर्देश पणन मंत्री जयकुमार रावल यांनी दिले.

बैठकीस भारतातील विविध राज्यांतील कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि पणन मंडळांना समन्वयित करणाऱ्या कौन्सिल ऑफ स्टेट ॲग्रीकल्चरल मार्केटिंग बोर्ड्सचे कार्यकारी संचालक डॉ. जे. एस. यादव उपस्थित होते. याशिवाय महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे संचालक आमदार चरणसिंह ठाकूर, पणन संचालक तथा महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम, सरव्यवस्थापक व मॅग्नेट प्रकल्प संचालक विनायक कोकरे, डॉ. अमोल यादव यांच्यासह संबंधित अधिकारीही बैठकीस उपस्थित होते.



यावेळी पणन मंत्री रावल म्हणाले की, दापचरी येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय कृषी बाजार प्रकल्पाद्वारे शेतमालाची खरेदी-विक्री, प्रतवारी, पॅकेजिंग, शीतसाखळी, साठवणूक, गुणवत्ता तपासणी, ई-लिलाव, कंटेनर वाहतूक आणि निर्यात सुलभता अशा सर्व सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देणारा तसेच देशातील सर्वात मोठा आंतरराष्ट्रीय कृषी बाजार विकसित करण्यात येईल. त्यामुळे शेतमालाच्या काढणीनंतरच्या व्यवस्थापनात सुधारणा होऊन शेतकऱ्यांना दर्जानुसार अधिक चांगला भाव मिळण्यास मदत होईल.

वाढवण बंदरापासून अवघ्या ४० किलोमीटर अंतरावर सुमारे १४०० एकर परिसरात उभारण्यात येणारा हा प्रकल्प फ्रान्समधील रुंगीस मार्केट, नेदरलँड्समधील रॉयल फ्लोरा हॉलंड तसेच रॉटरडॅम बंदर परिसरातील आधुनिक कृषी लॉजिस्टिक व्यवस्थेच्या धर्तीवर विकसित करण्यात येणार आहे. याशिवाय चीन, दक्षिण आफ्रिका या देशांतील उत्तम मार्केटचा अभ्यास करून या प्रकल्पाची उभारणी करण्यात येणार आहे. दापचरी बाजाराला वाढवण डीपवॉटर पोर्टसह नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, जवाहरलाल नेहरू बंदर, राष्ट्रीय महामार्ग आणि रेल्वे संपर्क तसेच प्रस्तावित बुलेट ट्रेन यांची जोड मिळणार आहे. या सक्षम लॉजिस्टिक जाळ्यामुळे फळे, भाजीपाला, फुले, धान्य, कडधान्ये, मसाले तसेच प्रक्रिया केलेल्या कृषी उत्पादनांची निर्यात अधिक वेगवान व किफायतशीर होईल, असा विश्वास मंत्री रावल यांनी व्यक्त केला.

कृषी बाजारव्यवस्थेतील आधुनिक बदल, बाजारांचे परस्पर जाळे, मूल्यसाखळी विकास आणि शेतमालाच्या निर्यातीच्या संधी यांचा आढावा मंत्री रावल यांनी यावेळी घेतला. राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्या, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ आणि राष्ट्रीय स्तरावरील पणन संस्थांमध्ये समन्वय वाढवून दापचरी प्रकल्पाला आदर्श कृषी-व्यापार केंद्राचे स्वरूप देण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला. प्रस्तावित प्रकल्प केवळ आंतरराष्ट्रीय दर्जाचा कृषी बाजार नव्हे, तर या ठिकाणी जागतिक दर्जाचे 'फूड हब' उभारण्याचे नियोजन असल्याचे मंत्री रावल यांनी यावेळी सांगितले. महाराष्ट्रातील विविध प्रकारचा कृषी माल प्रक्रिया करून देशांतर्गत तसेच जागतिक बाजारपेठेत पोहोचविण्यासाठी हे केंद्र महत्त्वाचे ठरेल. "भारतातीलच नव्हे, तर जगातील एक मोठे फूड हब महाराष्ट्रात उभे करण्याचा शासनाचा संकल्प आहे," असे रावल म्हणाले. राज्यात आंतरराष्ट्रीय बाजार, राष्ट्रीय महत्त्वाचा बाजार आणि कृषी उत्पन्न बाजार समिती अशी त्रिस्तरीय विपणन व्यवस्था विकसित करण्याचे नियोजन असून, त्यातून कृषी मालाच्या मूल्यसाखळीला बळकटी मिळणार आहे. निर्यात बाजार सुविधांचे एकत्रीकरण, काढणीनंतरचे मूल्यवर्धन, संगणकीकृत व पारदर्शक व्यवहार आणि आधुनिक बाजार पायाभूत सुविधा यावर या ठिकाणी विशेष भर दिला जाणार असल्याचे मंत्री रावल यांनी सांगितले. डॉ. जे. एस. यादव यांनी देशातील कृषी बाजारांच्या आधुनिकीकरणासाठी आवश्यक असलेल्या नियोजनाबाबत मार्गदर्शन केले.

# १२५ 'हिरकणी कक्ष' उभारले जाणार

■ मुंबई(दै. संध्या)

महाराष्ट्रातील लाखो महिला प्रवाशांच्या सुरक्षितता, आरोग्य आणि सन्मानाच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल उचलत महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रायव्हेट लिमिटेडसोबत १२५ 'हिरकणी कक्ष' उभारण्यासाठी सामंजस्य करार केला आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत हा करार झाला. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार तसेच परिवहन मंत्री प्रताप सरनाईक उपस्थित होते.

महिलांना, विशेषतः स्तनदा मातांना, प्रवासादरम्यान आपल्या बाळाची काळजी घेण्यासाठी स्वच्छ, सुरक्षित आणि खासगी जागा उपलब्ध व्हावी, या उद्देशाने 'हिरकणी कक्ष' उभारण्यात येणार आहेत. एसटीच्या बसस्थानकांवर मातृत्वाला आवश्यक असलेली संवेदनशीलता आणि सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वाचा ठरणार आहे.

या प्रकल्पासाठी टोयोटा किर्लोस्कर मोटर प्रायव्हेट लिमिटेड आपल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी उपक्रमांतर्गत सहकार्य करणार आहे. सामंजस्य करारानुसार राज्यातील एसटी बसस्थानकांवर अंदाजे ३ मीटर × ३ मीटर आकाराचे प्री-फॅब्रिकेटेड 'हिरकणी कक्ष' उभारण्यात येणार आहेत. या कक्षांमध्ये मातांना स्तनपानासह बाळाची निगा राखण्यासाठी आवश्यक अशी सुरक्षित आणि खासगी जागा उपलब्ध करून दिली जाणार आहे. यासोबतच आवश्यक फर्निचर, फिक्स्चर, अंतर्गत वायरिंग, विद्युतीकरण तसेच इलेक्ट्रॉनिक साहित्य यांचाही समावेश प्रकल्पात करण्यात आला आहे.

सामंजस्य करारामधील नियोजनानुसार तीन आर्थिक वर्षांत एकूण १२५ 'हिरकणी कक्ष' उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. यात २०२६-२७ : ५० कक्ष, २०२७-२८ : ५० कक्ष आणि २०२८-२९ : २५ कक्ष उभारले जातील. सीएसआर धोरण, उपलब्ध जागा आणि स्थानिक गरजेनुसार या संख्येत आवश्यकतेनुसार बदल करण्याची तरतूदही करारात करण्यात आली आहे.

या प्रकल्पासाठी एसटी महामंडळाकडून सुमारे ५ मीटर × ५ मीटर जागा उपलब्ध करून देणे, आवश्यक वीज, पाणी आणि स्थापनेसाठी सहकार्य करणे तसेच आवश्यक शासकीय परवानग्या मिळविणे अपेक्षित आहे. प्रकल्प पूर्ण होऊन साहित्य व सुविधा महामंडळाकडे हस्तांतरित झाल्यानंतर कक्षांचे संचालन, सुरक्षा, दुरुस्ती, देखभाल आणि देखरेख करण्याची संपूर्ण जबाबदारी एसटीची राहणार आहे.

विशेष म्हणजे, सामंजस्य करारामध्ये या प्रकल्पासाठी एसटीकडून कोणतेही आर्थिक योगदान राहणार नाही. टोयोटा किर्लोस्करच्या सीएसआर उपक्रमातून हा प्रकल्प राबविला जाणार आहे. एसटी ही केवळ प्रवासाची सेवा नसून महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनाशी जोडलेली लोकवाहिनी आहे. ग्रामीण भागापासून शहरांपर्यंत दररोज लाखो प्रवाशांना सेवा देणाऱ्या एसटीच्या बसस्थानकांवर स्तनदा मातांसाठी स्वतंत्र सुविधा उपलब्ध झाल्याने महिला प्रवाशांच्या सन्मानात आणि प्रवासाच्या अनुभवात निश्चितच सकारात्मक भर पडणार आहे. 'हिरकणी कक्ष' हा केवळ एक सुविधा प्रकल्प नसून मातृत्वाचा सन्मान, महिलांच्या गरजांची जाणीव आणि प्रवासी-केंद्रित एसटी व्यवस्थेच्या दिशेने टाकलेले संवेदनशील पाऊल ठरणार आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### जल बाथ फिटिंग्जने वामिका गब्बीची ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली

पुणे : दैनिक संध्या

प्रीमियम बाथ फिटिंग्ज आणि सॅनिटरीवेअर ब्रँड जल बाथ फिटिंग्जने अभिनेत्री वामिका गब्बी हिची अधिकृत ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे. यानिमित्ताने कंपनीने नवीन डिजिटल ब्रँड फिल्महीप्रदर्शित केली. 'मूल्य आणि अभिजातता' या संकल्पनेवर आधारित या फिल्ममध्ये आधुनिक भारतीय ग्राहकांच्या बदलत्या पसंती आणि जीवनशैलीचे चित्रण करण्यात आले आहे. उत्कृष्ट डिझाइन, गुणवत्ता आणि योग्य मूल्य यांचा समतोल साधण्याचा संदेश या माध्यमातून देण्यात आला आहे. यावेळी जल बाथ फिटिंग्जचे विपणन संचालक सिद्धांत कपूर आणि संचालक विवेक कपूर यांनी वामिका गब्बी ही ब्रँडच्या मूल्यांशी सुसंगत असल्याचे सांगितले. वामिका गब्बीनेही जलसोबत जोडले गेल्याचा आनंद व्यक्त करत, सुंदर, साधी आणि टिकाऊ उत्पादने ही आपलीही पसंती असल्याचे नमूद केले.

### शालेय बुद्धिबळ स्पर्धेत शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलचे यश



सासवड : : दैनिक संध्या

म. ए. सो. वाघिरे विद्यालय, सासवड येथे दिनांक १५ सप्टेंबर २०२६ रोजी पुरंदर तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धा उत्साहात पार पडल्या. या स्पर्धेत श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संचलित शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, सासवडच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी करत विद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला. या स्पर्धेत १४ वर्षे वयोगटातील मुलांच्या गटात अर्जुन विलास भाडळे याने प्रथम क्रमांक पटकावत उत्कृष्ट बुद्धिबळ कौशल्याचे प्रदर्शन केले. तसेच १४ वर्षांखालील मुलींच्या गटात आर्या नितीन होले हिने पाचवा क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली. या दोन्ही गुणवंत विद्यार्थ्यांची पुढील जिल्हास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे . त्यांच्या या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय वाटचालीत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला आहे. यशस्वी विद्यार्थ्यांना विद्यालयाचे क्रीडा शिक्षक श्री. संतोष गलांडे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण सरावाला, मेहनतीला आणि जिद्दीला मिळालेल्या या यशाबद्दल विद्यालयाचे प्राचार्य श्री. अभिजीत टकले सर, उपप्राचार्य सौ. सुषमा रासकर मॅडम तसेच श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ, सासवड संस्थेचे सर्व अधिकारी व पदाधिकारी यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. तसेच अर्जुन भाडळे व आर्या होले यांना जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी मनःपूर्वक शुभेच्छा देत त्यांच्या पुढील उज्ज्वल वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या.

### गणेशोत्सवासोबत फेस्टिव्ह फॅशनचा उत्साह; Nykaa Fashion वर नवे ट्रेंड

पुणे : दैनिक संध्या



गणेश चतुर्थीच्या आगमनासोबतच फेस्टिव्ह सीझनला सुरुवात झाली असून, यंदा पारंपरिक आणि मॉडर्न फॅशनचा सुंदर मिलाफ पाहायला मिळत आहे. Nykaa Fashion वर आकर्षक कुर्ता सेट्स, अनारकली, मॉडर्न को-ऑर्ड सेट्स आणि साड्यांचे विविध पर्याय उपलब्ध आहेत. गुलाबी, नारंगी आणि हिरव्या रंगांपासून एम्ब्रॉयडरी, मिरर वर्क आणि झरी डिटेलिंगपर्यंत, यंदाच्या कलेक्शनमध्ये फेस्टिव्ह लूकला आधुनिक टच देण्यात आला आहे. KALKI, Aadveka, Vaamsi, Odette आणि Shop Gulmohar यांसारख्या ब्रँड्सचे स्टाइलिश पर्याय विविध सेलिब्रेशनसाठी योग्य ठरतात. गणपती दर्शन असो, कौटुंबिक सोहळा किंवा मित्रांसोबतची पार्टी—प्रत्येक फेस्टिव्ह क्षणासाठी परफेक्ट स्टाइल, फक्त Nykaa Fashion वर.




### AI+ स्मार्टफोनचे सर्व्हिस नेटवर्क १,००० टचपॉइंट्सपर्यंत विस्तारण्याची योजना

पुणे : दैनिक संध्या

AI+ स्मार्टफोनने भारतातील विक्रीपश्चात सेवा अधिक सक्षम करण्यासाठी देशभरातील सर्व्हिस नेटवर्क १,००० हून अधिक टचपॉइंट्सपर्यंत विस्तारण्याची घोषणा केली आहे. सध्या ८०० हून अधिक सर्व्हिस सेंटर्सचे नेटवर्क असून, त्यात आणखी २०० हून अधिक केंद्रांची भर पडणार आहे. तसेच, दिवाळीच्या काळात दिल्ली येथे AI+ चे पहिले एक्सक्लुझिव्ह सर्व्हिस सेंटर सुरू करण्यात येणार आहे. ग्राहकांच्या सेवेसाठी कंपनीने AI+ असिस्टन्स ॲप देखील सादर केले आहे. या ॲपद्वारे सर्व्हिस बुकिंग, तिकीट तयार करणे व त्याचा मागोवा घेणे, वॉरंटीची माहिती, जवळचे सर्व्हिस सेंटर शोधणे आणि समस्यानिवारणासाठी मदत मिळणार आहे.

# ग्रीनएक्स एन्व्हायर्न्मेंटलतर्फे पहिल्या EPD परिषद 2026 चे आयोजन

■ पुणे (दै. संध्या)



ग्रीनएक्स एन्व्हायर्न्मेंटलने आज ताज लँड्स एंड, वांद्रे वेस्ट, मुंबई येथे भारतातील पहिल्या EPD परिषद 2026 चे आयोजन केले. या परिषदेला धोरणकर्ते, नियामक संस्था, आंतरराष्ट्रीय EPD प्रोग्राम ऑपरेटर्स, शाश्वतता तज्ज्ञ आणि भारतीय तसेच बहुराष्ट्रीय उत्पादन कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते, आणि पर्यावरणीय पारदर्शकता व शाश्वत उत्पादनाच्या भविष्यावर एक महत्त्वपूर्ण संवाद यानिमित्ताने घडला.

या परिषदेत एन्व्हायर्न्मेंटल प्रोडक्ट डिक्लेरेशन्स (EPD) चं वाढतं महत्त्व आणि विश्वासार्ह, वैज्ञानिक आधार असलेला पर्यावरणीय डेटा उद्योगांना जागतिक शाश्वतता मानकांशी जुळवून घेण्यास कशी मदत करतो, यावर भर देण्यात आला. दिवसभर चाललेल्या चर्चांमध्ये लाइफ सायकल असेसमेंट (LCA), प्रोडक्ट कार्बन फूटप्रिंट (PCF) आणि EPD यांच्या मदतीने व्यवसाय आपल्या उत्पादनांचा पर्यावरणीय प्रभाव अधिक पारदर्शकपणे कसा मोजू, पडताळू आणि लोकांसमोर मांडू शकतात, यावर सविस्तर मंथन झाले.

या कार्यक्रमात आंतरराष्ट्रीय EPD प्रोग्राम ऑपरेटर्स आणि शाश्वतता क्षेत्रातील तज्ज्ञांसह नॉर्वेचे प्रतिनिधी, जागतिक उद्योग संस्था आणि भारताच्या नियामक यंत्रणेतील MPCB, BIS आणि निती आयोगाचे प्रतिनिधीही सहभागी झाले. प्रमुख भारतीय आणि बहुराष्ट्रीय उत्पादन कंपन्यांच्या वरिष्ठ प्रतिनिधींनीही चर्चांमध्ये भाग घेतला.

यामुळे विविध घटकांना एकमेकांचं ज्ञान समजून घेणं, जगभरात उदयाला येत असलेल्या पद्धतींवर बोलणं आणि भारतात EPD चा वापर वाढवण्याचे मार्ग शोधणं यासाठी एक चांगलं व्यासपीठ मिळालं.

"एन्व्हायर्न्मेंटल प्रोडक्ट डिक्लेरेशन्समुळे भारतीय उद्योगाला विश्वासार्ह आणि पारदर्शक पर्यावरणीय डेटाच्या आधारे अधिक विश्वास कमावता येईल. अशा व्यासपीठांमुळे नियामक, उद्योग आणि जागतिक शाश्वतता क्षेत्रातील घटकांमधलं सहकार्य वाढतं, आणि व्यवसायांना मोजता येण्याजोग्या पर्यावरणीय पद्धती स्वीकारण्याची प्रेरणाही मिळते." श्री सिद्धेश रामदास कदम, अध्यक्ष, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (MPCB) "भारतातील पहिली EPD परिषद ही शाश्वत उत्पादनाच्या मुख्य प्रवाहात पर्यावरणीय पारदर्शकता आणण्याच्या दिशेने टाकलेलं एक महत्त्वाचं पाऊल आहे. लाइफ सायकल असेसमेंट, विश्वासार्ह डेटा आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील EPD पद्धती एकत्र आणून भारतीय व्यवसाय आपले शाश्वतता प्रयत्न अधिक मोजण्याजोगे, पारदर्शक आणि जागतिक दर्जाचे बनवू शकतात." श्रीमती आरती भोसले-अहिवले, व्यवस्थापकीय संचालक, ग्रीनएक्स एन्व्हायर्न्मेंटल प्रा. लि. "EPD परिसंस्था उद्योगाला केवळ शाश्वततेची आश्वासनं देण्यापलीकडे जाऊन प्रत्यक्ष, मोजण्याजोगी पर्यावरणीय कामगिरी दाखवण्याची संधी देते. जागतिक तज्ज्ञ, प्रोग्राम ऑपरेटर्स आणि भारतीय घटकांना एकत्र आणल्याने पडताळणी केलेली पर्यावरणीय माहिती व्यवसायांसाठी अधिक सहज उपलब्ध आणि उपयुक्त होते." श्री सागर अहिवले, व्यवस्थापकीय संचालक, ग्रीन सोल्यूशन इंडस्ट्रीज प्रा. लि. परिषदेची सुरुवात "फ्रॉम ट्रान्सपरन्सी टू ट्रान्सफॉर्मेशन: द ग्लोबल इव्होल्यूशन ऑफ EPDs" या उद्घाटन सत्राने झाली, ज्यातून जागतिक बाजारपेठांमध्ये पर्यावरणीय उत्पादन पारदर्शकतेचं महत्त्व का वाढतंय, याची पार्श्वभूमी मांडली गेली.

कार्यक्रमात सुरुवातीला EPD आणि आंतरराष्ट्रीय मानकांच्या मूलभूत बाबी समजावून सांगितल्या गेल्या, त्यानंतर लाइफ सायकल असेसमेंट (LCA), प्रोडक्ट कार्बन फूटप्रिंट (PCF) आणि शाश्वततेचे निर्णय अधिक माहितीपूर्ण व विश्वासार्ह बनवण्यात EPD ची भूमिका, यावर चर्चा झाली. संपूर्ण EPD प्रवास समजून घेणं म्हणजे LCA मॉडेलिंग आणि डेटा जमा करण्यापासून ते मान्यताप्राप्त जागतिक प्रोग्राम ऑपरेटर्समार्फत पडताळणी आणि प्रकाशनापर्यंत हा परिषदेचा एक महत्त्वाचा भाग होता. तज्ज्ञांनी भारतीय व्यवसायांसमोरील अडचणीही मांडल्या आणि उद्योग, नियामक, प्रोग्राम ऑपरेटर्स व शाश्वतता क्षेत्रातील व्यावसायिक यांच्यात अधिक जवळचं सहकार्य कसं वाढवता येईल, यावर विचार मांडले.

## अनुराधा मराठे यांचा संगीतसाधनेबद्दल पुणे फेस्टिव्हलतर्फे सत्कार

■ पुणे (दै. संध्या)



प्रख्यात मराठी सुगम संगीत गायिका अनुराधा मराठे यांच्या वयाची ७५ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त पुणे फेस्टिव्हलतर्फे त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला. पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल यांच्या हस्ते मंगळवारी पत्रकार भवन, नवी पेठ येथे हा सत्कार झाला. यावेळी पुणे फेस्टिव्हलचे जनरल सेक्रेटरी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचे मुख्य संयोजक डॉ. सतीश देसाई, मुख्य संयोजक ॲड. अभय छाजेड, नगरसेवक सुनील शिंदे, मोहन टिल्लू आदी उपस्थित होते.

यानिमित्ताने ज्येष्ठ निवेदिका मंजिरी धामणकर यांनी अनुराधा मराठे यांच्या प्रदीर्घ संगीत प्रवासावर आधारित प्रकट मुलाखत घेतली. कार्यक्रमाची सुरुवात तन्मयी मेहेंदळे-कुलकर्णी यांनी यमन रागातील गणेशस्तवनाने केली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात पुणे फेस्टिव्हलचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल म्हणाले, "३८व्या पुणे फेस्टिव्हलची दिमाखदार सुरुवात झाली आहे. अनुराधा मराठे यांचा सत्कार म्हणजे अखंड संगीतसाधनेचा सन्मान आहे. कलाकाराचा सन्मान हा केवळ त्या कलाकाराचा नसून संपूर्ण संगीत क्षेत्राचा सन्मान असतो. वय वाढते तसे कलाकाराची कला अनुभवातून अधिक समृद्ध होत जाते."

## दगडूशेठ गणपती समोर ३५ हजार महिलांचे अथर्वशीर्ष पठण

■ पुणे (दै. संध्या)



ओम नमस्ते गणपतये... मोरया, मोरया... आणि ओम गं गणपतये नमः... च्या जयघोषाने ऋषीपंचमी निमित्त आयोजित सोहळ्यात उर्जेने भारलेल्या वातावरणामध्ये हजारो महिलांच्या गर्दीचा उच्चांक पाहायला मिळाला. तब्बल ३५ हजार पेक्षा जास्त महिलांनी एकत्र येत अथर्वशीर्ष पठणातून गणरायाला नमन केले. गणेश नामाचा जयघोष, अथर्वशीर्ष आणि महाआरतीने संपूर्ण वातावरण भक्तीमय झाले होते.

निमित्त होते, श्रीमंत दगडूशेठ हलवाई सार्वजनिक गणपती ट्रस्ट, सुवर्णयुग तरुण मंडळ च्यावतीने ट्रस्टच्या १३४ व्या वर्षीच्या गणेशोत्सवात उत्सव मंडपासमोर आयोजित अथर्वशीर्ष पठण सोहळ्याचे. यावेळी ऋषिपंचमीनिमित्त ३५ हजार महिलांचे अर्थवशीर्ष पठण गणेशोत्सवातील प्रेम मंदिराच्या प्रतिकृती समोर पार पडले.

पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, विभागीय आयुक्त शीतल तेली - उगले, ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, शुभांगी भालेराव, अर्चना भालेराव, सुवर्णयुग तरुण मंडळाचे सौरभ रायकर, यतिश रासने, मंगेश सूर्यवंशी, राजाभाऊ घोडके, सचिन आखाडे, अंकुश रासने यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. परिमंडळ १ चे पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले यांचा यावेळी सन्मान करण्यात आला. पावसाचे वातावरण असले तरी पारंपरिक वेशात मध्यरात्री २ वाजल्यापासून महिलांनी या उपक्रमाकरीता हजेरी लावण्यास सुरुवात केली. उपक्रमाचे ४१ वे वर्ष होते.

## विकासकामांना गती देण्यासाठी पिंपरी-चिंचवडमध्ये 'एमडी पॅटर्न'

■ पिंपरी-चिंचवड (दै. संध्या)



जिल्हाधिकारी कार्यालय, महापालिका प्रशासनाकडे प्रलंबित असलेल्या विकासकामांना गती देण्यासाठी आता 'एमडी पॅटर्न' राबवण्यात येणार आहे. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत भूसंपादन, जागा आरक्षण, जागा हस्तांतरण आणि प्रशासकीय मान्यतेअभावी रखडलेल्या सात प्रमुख विषयांचा प्रकरणनिहाय आढावा घेण्यात आला. प्रत्येक कामासाठी जबाबदार अधिकारी, नोडल यंत्रणा आणि निश्चित कालमर्यादा ठरवून पुढील बैठकीत 'ॲक्शन टेकन रिपोर्ट' सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

पुणे जिल्हाधिकारी कार्यालय येथे झालेल्या बैठकीला जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी तसेच महसूल, भूसंपादन, भूमी अभिलेख, वन विभाग आणि महापालिकेचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. यावेळी "भोसरी विधानसभा मतदारसंघातील ही सर्व कामे नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी आणि मतदारसंघाच्या भविष्यातील विकासाशी संबंधित आहेत. त्यामुळे केवळ बैठकीपुरती चर्चा नको. प्रत्येक विषयावर ठोस निर्णय घेऊन जबाबदार अधिकारी आणि निश्चित कालमर्यादा ठरवावी. त्यानुसार प्रत्यक्ष कार्यवाही झाली पाहिजे," अशी स्पष्ट भूमिका आमदार महेश लांडगे यांनी मांडली.

पिंपरी-चिंचवड शहरासह भोसरी विधानसभा मतदारसंघातील अनेक महत्त्वाचे रस्ते, रस्त्यांचे रुंदीकरण आणि एकूण २२ 'मिसिंग लिंक'ची कामे भूसंपादनाअभावी रखडली आहेत. चाकण औद्योगिक क्षेत्राशी कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी ही कामे प्राधान्याने पूर्ण करण्याची गरज बैठकीत अधोरेखित करण्यात आली. प्रत्येक रस्त्यासाठी आवश्यक क्षेत्रफळ, सर्व्हे क्रमांक, बाधित जमीनमालक, मोबदला आणि भूसंपादनाचा सद्य टप्पा यांची प्रकरणनिहाय माहिती सादर करण्याचे निर्देश देण्यात आले.

## RWA टोकनायझेशनसाठी RealX आणि MST Blockchainचे 'The Box' लॉन्च

■ पुणे (दै. संध्या)



रिअल-वर्ल्ड ॲसेट्सच्या (RWA) नियमांचे पालन करून टोकनायझेशन सक्षम करण्यासाठी RealX आणि MST Blockchain यांनी Liminalच्या भागीदारीत 'The Box' हे स्वदेशी इन्फ्रास्ट्रक्चर व्यासपीठ लॉन्च केले. World Trade Centre Mumbai हे या उपक्रमाचे इकोसिस्टम पार्टनर आहे.

या अंतर्गत RealX REDbox आणि Whitebox हे दोन प्लॅटफॉर्म सादर करण्यात आले आहेत. REDbox हे Platform-as-a-Service (PaaS) सोल्यूशन असून, रिअल इस्टेट डेव्हलपर्सना त्यांच्या स्वतःच्या ब्रँडअंतर्गत टोकनाइज्ड प्रॉपर्टी ऑफरिंग सुरू करण्याची सुविधा देते. तर Whitebox हे ओपन-आर्किटेक्चर इन्फ्रास्ट्रक्चर असून, स्टार्टअप्स, कॉर्पोरेट्स आणि ॲसेट व्यवसायांना स्वतःचे RWA टोकनायझेशन प्लॅटफॉर्म उभारता येणार आहे. दोन्ही प्लॅटफॉर्म MST Blockchainच्या भारतीय Layer-1 तंत्रज्ञानावर आधारित आहेत. RealXकडून कायदेशीर व अनुपालनाची चौकट, तर MST Blockchainकडून सुरक्षित, स्केलेबल आणि ऑडिटयोग्य ब्लॉकचेन इन्फ्रास्ट्रक्चर उपलब्ध करून दिले जाणार आहे.

# डीएस ग्रुपच्या पल्स कँडीचा गणेश महोत्सवाचा उत्साह

■ पुणे (दै. संध्या)

यंदाच्या गणेश महोत्सवा निमित्त धर्मपाल सत्यपाल ग्रुप ( डीएस ग्रुप ) या आघाडीच्या एफएमसीजी समूह आणि बहुव्यवसायिक कंपनीच्या लोकप्रिय ब्रँडपैकी एक असलेल्या पल्स कँडी कडून महाराष्ट्रात सलग पाचव्या वर्षी गणेश महोत्सव साजरा करण्यात येत आहे. 'देश की पल्स से बना गणपती त्योहार' या व्यापक ब्रँड संकल्पनेला पुढे नेत हा उत्सव साजरा केला जात आहे.

महाराष्ट्रभर गणपती उत्सवाला लाभलेली सामूहिक भावना, परंपरा आणि भक्ती यांना केंद्रस्थानी ठेवत पल्स कँडीने गेल्या काही वर्षांत आपल्या गणेशोत्सवाच्या संकल्पनेत सातत्याने नवनवीन उपक्रमांची भर घातली आहे. ग्राहकांचा सहभाग अधिक वाढविण्यासाठी नाविन्यपूर्ण अनुभव निर्माण करण्याबरोबरच उत्सवाच्या मूळ भावनेशीही ब्रँडने सातत्याने नाते कायम ठेवले आहे. ही मोहीम १४ ते २३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत महाराष्ट्रातील मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद आणि जळगाव या प्रमुख बाजारपेठांमध्ये राबविण्यात येणार आहे.

या व्यापक संकल्पने अंतर्गत ग्राहकांसाठी राबविण्यात येणाऱ्या ' पल्स से अर्पण, बप्पा को समर्पण' या मोहिमेद्वारे नाविन्यपूर्ण अनुभवाची ही परंपरा पुढे नेण्यात येत आहे.

या उपक्रमात भक्तांना परस्परसंवादी आणि मूषकावर आधारित अनुभवाच्या माध्यमातून बाप्पाला वैयक्तिक स्वरूपात डिजिटल अर्पण करण्याची संधी मिळणार आहे.

भक्तीची शाश्वत भावना, आधुनिक तंत्रज्ञान आणि ग्राहकांचा सहभाग यांचा संगम साधत हा उपक्रम पारंपरिक भक्तीला आधुनिक स्वरूप देतो. मोठ्या संख्येने भाविक उपस्थित राहत असल्याने प्रत्येक भक्ताला स्वतःच्या इच्छेनुसार बाप्पाला अर्पण करता येणे अनेकदा शक्य होत नाही.

ही बाब लक्षात घेऊन ' पल्स से अर्पण, बप्पा को समर्पण' ' या




उपक्रमाच्या माध्यमातून तंत्रज्ञानाचा वापर करून भक्तांना बाप्पाला वैयक्तिक डिजिटल अर्पण करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

भक्ताने आपले अर्पण तयार केल्यानंतर घंटानाद होतो आणि भगवान गणेशांचे दिव्य दूत असलेला मूषक विविध आकर्षक दृश्यरूपांमध्ये प्रकट होऊन भक्ताने निवडलेले अर्पण बाप्पा पर्यंत पोहोचवतो. या संपूर्ण प्रवासाच्या शेवटी पडद्यावर अर्पण पूर्ण झाल्याची पुष्टी केली जाते.

त्यामुळे भक्तांसाठी हा एक संस्मरणीय आणि वैयक्तिक अनुभव ठरतो.या विशेष अनुभवात आणखी एक अर्थपूर्ण भर म्हणून सहभागी ग्राहकांना पल्स कँडी चे पाकीट आणि ब्रँडेड, लागवड करता येणाऱ्या बियांच्या कागदापासून तयार केलेले कार्ड प्रतीकात्मक आशीर्वाद म्हणून देण्यात येणार आहे.

व्हाट्सअप च्या माध्यमातून सहभागी होणाऱ्या ग्राहकांना वैयक्तिक स्वरूपातील गणपती शुभेच्छा संदेशही प्राप्त होणार असून, त्यामुळे डिजिटल अनुभवाला आणखी व्यापक स्वरूप मिळणार आहे.

याशिवाय, मोहिमेच्या मायक्रो साइटवर उपलब्ध असलेल्या डिजिटल अर्पणाच्या अनुभवाच्या माध्यमातूनही ग्राहकांना सहभागी होता येणार आहे. त्यामुळे ग्राहक कुठूनही या मोहिमेचा भाग बनू शकतात.

या मोहिमेबद्दल बोलताना, डीएस (DS) ग्रुपच्या कन्फेक्शनरी विभागातील मार्केटिंगचे वरिष्ठ महाव्यवस्थापक आशिष भार्गव म्हणाले, "गणेश महोत्सव हा महाराष्ट्रातील अत्यंत महत्त्वाचा सण आहे.

या उत्सवामागील भावना, भक्ती आणि सांस्कृतिक वैशिष्ट्य आम्ही डीएस ग्रुप मध्ये मनापासून समजून घेतो. सलग पाचव्या वर्षी लालबागचा राजा यांच्याशी जोडले जाणे हा ब्रँडसाठी अभिमानाचा क्षण असून, ग्राहकांशी अर्थपूर्ण नाते निर्माण करण्याच्या आमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे प्रतिबिंब आहे.